


महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026

मंगळवार, दि. २५ नोव्हेंबर २०२५




मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे | नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४ थे | अंक : ०७४ | किंमत : ४.०० रूपये | Gmail : aklgavakari@gmail.com Gmail : punegavkari@gmail.com




# गोड माणूस हरपला



## ज्येष्ठ अभिनेते धर्मेंद्र यांचे आज प्रदिर्घ आजाराने निधन; शरद पवार, राज ठाकरेंसह अनेकांची धर्मेंद्र यांना श्रद्धांजली

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

ज्येष्ठ अभिनेते धर्मेंद्र यांचे आज प्रदिर्घ आजाराने निधन झाले. ते 89 वर्षांचे होते. त्यांनी मुंबईतील आपल्या राहत्या घरी अखेरचा श्वास घेतला. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार, मनसे अध्यक्ष राज ठाकरे, काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांच्यासह अनेक नेत्यांनी धर्मेंद्र यांच्या निधनावर शोक व्यक्त केला आहे.

धर्मेंद्र यांच्या रुपाने सिनेसृष्टीने एक अतिशय देखणा, सुदृढ, मोहक हास्य, मर्दानीपणा असणारा, पण त्यात कुठेही दांडगाई नसणारा हिरो गमावला, अशी भावना या नेत्यांनी व्यक्त केली आहे. शरद पवार अभिनेते धर्मेंद यांना श्रद्धांजली वाहताना म्हणाले, 1960 च्या दशकात भारतीय सिनेसृष्टीत पदार्पण करून चित्रपटात सर्वसामान्य माणसांचं प्रतिनिधित्व करणाऱ्या कथानकांमधून उठावदार भूमिका साकारणारे आणि भारतीय प्रेक्षकांची मनं जिंकून सिनेजगतात आपली स्वतंत्र ओळख निर्माण करणाऱ्या ज्येष्ठ अभिनेते धर्मेंद्र देओल यांची मृत्यूशी झुंज अखेर अपयशी ठरली. आताच्या तरुणाईला कल्पना नसेल पण एक पिढी त्यांच्या लकबीची, त्यांच्या केशभूषेची, वेशभूषेची चाहती होती. 'शोले'मध्ये त्यांनी साकारलेला 'वीरू' आजही घनिष्ठ मैत्रीचं प्रतीक आणि तडफदार नायक म्हणून भारतीय रसिकमनांवर अधिराज्य गाजवतो आहे. अनेक वेळा 'शोले'मधील त्यांचा पाण्याच्या टाकीवरील खुमासदार प्रसंग आजही आमच्या राजकीय क्षेत्रात उत्साही कार्यकर्ते आंदोलन म्हणून अंगिकारतात. 'धरम वीर', 'चुपके चुपके', 'सत्यकाम', 'अनुपमा', 'मेरा गाँव मेरा देश' आणि 'ड्रीम गर्ल' ह्यासारख्या जवळपास 250 सुप्रसिद्ध कलाकृतीत धर्मेंद्र ह्यांनी साकारलेल्या भूमिका कायम स्मरणात राहतील. सिनेसृष्टीच्या 'धरम पाजीं'ना भावपुर्ण श्रद्धांजली अर्पण करतो व देओल कुटुंबीयांप्रती सहवेदना व्यक्त करतो. मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी धर्मेंद्र यांच्या रुपाने सध्याच्या गुंतागुंतीच्या जगातला एक सरळ माणूस हरवल्याची भावना व्यक्त केली आहे.

## थोडक्यात...

### पोलिसांनी रोखला बालविवाह

सिन्नर (नाशिक) (समर्थ गांवकरी) : तालुक्यातील बारागावपिंप्री येथे एका अल्पवयीन मुलीचा बालविवाह करण्याचा प्रयत्न एमआयडीसी पोलिसांनी वेळेवर हाणून पाडला. शनिवारी (दि.22) मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार पोलिसांनी तत्काळ कारवाई करुन हा विवाह थांबवला. अल्पवयीन मुलीचा पारंपरिक पद्धतीने विवाह लावण्याची तयारी सुरु असल्याची माहिती मिळताच पोलीस निरीक्षक भरत जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक जितेंद्र पाटील, उपनिरीक्षक राजू पाटील तसेच हवालदार प्रशांत वाघ, सागर गिते आणि प्रमोद भोये यांचे पथक घटनास्थळी दाखल झाले. तेथे वधू-वर पक्ष आणि वऱ्हाडी मंडळी उपस्थित असताना पोलिसांनी विवाहप्रक्रिया तात्काळ थांबवली. तपासादरम्यान वधूचे शाळेचे दाखले आणि आधार कार्ड तपासले असता ती अल्पवयीन असल्याचे स्पष्ट झाले. त्यानंतर पोलिसांनी नातलगांचे समुपदेशन करत बालविवाह प्रतिबंधक कायद्याची माहिती दिली. तसेच बालकल्याण समिती व ग्रामविकास अधिकाऱ्यांच्या मदतीने त्या मुलीच्या संरक्षणाची कार्यवाही करण्यात आली.

### नव्या इमारतीतून कारभार

छत्रपती संभाजीनगर (समर्थ गांवकरी) : साजापूर-करोडी परिसरात आरटीओ कार्यालयाची पाच मजली टोलेजंग इमारतीचे काम पूर्ण झालेले आहे. मुख्य गेट, कॅन्टीनचे काम अंतिम टप्प्यात आले असून, हे काम डिसेंबरअखेर पूर्ण करण्यात येणार आहे. हे काम होताच 26 जानेवारी 2026 पासून नव्या इमातीतून कारभार सुरु करण्याची दाट शक्यता आहे. जुन्या इमारतीच्या जागेवर नवीन इमारत उभारण्यात येणार असून, तसा प्रस्ताव वरिष्ठांकडे पाठवला असल्याची माहिती प्रादेशिक परिवहन अधिकारी विजय काठोळे यांनी दिली.

# न्यायालयातून हातकडीसह पळाला, रिक्षाने जाताना नाकाबंदीत सापडला

- हसूल पोलिस व वाहतूक शाखेची कारवाई

**छत्रपती संभाजीनगर : (समर्थ गांवकरी)**

पोलिसांच्या हातावर तुरी देऊन न्यायालयाच्या आवारातून हातकडीसह पसार झालेल्या आरोपीला नाकाबंदीत रिक्षातून पळून जाताना हसूल व वाहतूक पोलिसांनी मुसक्या आवळल्या. ही कारवाई सोमवारी (दि. २४) हर्सल टी पॉइंट येथे दुपारी पाचच्या सुमारास करण्यात आली. कारभारी श्यामलाल घुसिंगे (४५, रा. निधोना, फुलंब्री) असे आरोपीचे नाव असल्याची माहिती हसूल ठाण्याच्या पोलिस निरीक्षक स्वाती केदार यांनी दिली. अधिक माहितीनुसार, निधोना येथे २०२२ साली केलेल्या कारवाईत आर-पेपी घुसिंगेकडे गांजाची झाडे मिळून आली होती. त्या गुन्ह्यात वॉरंट बजावण्यात आल्याने त्याला सोमवारी फुलंब्री पोलिस ठाण्याचे जमादार दिलवाले दुपारी अटक करून सेशन कोर्टात घेऊन आले होते.

मात्र, त्याने त्यांना गुंगारा देऊन हातकडीसह कोर्ट परिसरातून पलायन केले. दरम्यान, शहरात सर्व चौकांमध्ये रिक्षा चालकांची तपासणी मोहीम सुरू होती. त्याचवेळी

हसूल टी पॉइंट भागात एका रिक्षात आरोपी घुसिंगे बसलेला होता. त्याने शर्टच्या आतमध्ये हातकडी लपविल्याचे दिसून शाखेचे उपनिरीक्षक दीपक ढोणे, हर्मूल पोलिस ठाण्याचे रामेश्वर कदम, दिनेश पुसे यांनी त्याला पकडून चौकशी केली. तेव्हा तो हातकडीसह पळून आल्याचे समोर आले.

# आयआयटी 'बॉम्बे'चे 'मुंबई' केले नाही, हे चांगलेच झाले!

## केंद्रीय मंत्री डॉ. जितेंद्र सिंह यांच्या विधानाने चर्चा




**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

देशाच्या इतिहासावर असलेले मुघल काळाचे आणि ब्रिटीश वसाहतवादाचे सावट पुसून टाकण्यासाठी नामांतराचा मार्ग अवलंबणाऱ्या केंद्र सरकारच्या विज्ञान-तंत्रज्ञान मंत्र्यांनी 'आयआयटी बॉम्बेच्या नावातील बॉम्बे तसेच ठेवले, त्याचे मुंबई केले नाहीत, हे चांगलेच झाले,' असे विधान केले. सोमवारी आयआयटी मुंबईच्या पी. सी. सक्सेना सभागृहात झालेल्या कार्यक्रमात विज्ञान-तंत्रज्ञानमंत्री डॉ. जितेंद्र सिंह यांनी क्वाण्टम-तंत्रज्ञान, वैद्यकीय क्षेत्राला मिळालेली तंत्रज्ञानाची जोड आदी विषयांवर भाष्य करताना आयआयटी मुंबईच्या नावावर ही टिपण्णी केली.

मुंबईला ब्रिटिशांनी दिलेल्या 'बॉम्बे' या नावाबाबतही हीच भूमिका अपेक्षित असताना आणि राज्य सरकारने अधिकृतपणे मुंबई हे नाव स्वीकारले असताना केंद्रीयमंत्री डॉ. जितेंद्र सिंह यांनी आयआयटीत एका कार्यक्रमात बोलताना 'जोपर्यंत आयआयटी बॉम्बेचा प्रश्न आहे, तुम्ही नावात बॉम्बे कायम ठेवले आणि त्याचे मुंबई केले नाही, याबद्दल देवाचे आभारच आहेत. आयआयटी मद्रासबद्दलही माझ्या याच भावना आहेत,' असे वक्तव्य केले. केंद्रीय मंत्र्यांनी शासनाच्या नामांतराच्या भूमिकेविरोधात प्रतिष्ठित शिक्षणसंस्थेच्या कार्यक्रमात विधान केल्याने उपस्थितांमध्ये चर्चेला उधाण आले. जगातील सर्वात गुंतागुंतीच्या गणिती आणि वैज्ञानिक समस्या काही क्षणांत सोडवणे, नवीन औषधांच्या शोधाची प्रक्रिया महिन्यांऐवजी काही दिवसांत पूर्ण करणे हे आता क्वाण्टम तंत्रज्ञानामुळे शक्य होणार आहे. यासाठी देशातील 100 अभियांत्रिकी महाविद्यालये आणि संशोधन संस्थांमध्ये क्वाण्टम-प्रशिक्षण प्रयोगशाळा उभारण्याची योजना राबवली जात असल्याची माहिती यावेळी त्यांनी दिली.

केंद्रीय मंत्रालयाचे सचिव डॉ. अभय करंदीकर यांनी या संदर्भात माहिती देताना सांगितले की, बी. टेक अभ्यासक्रमातील गौण (मायनर) विषय म्हणून क्वाण्टम तंत्रज्ञानाबद्दल शिकवले जाणार आहे. त्यासाठी अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने (एआयसीटीई) मान्यता दिली आहे. विशेष म्हणजे या विषयासाठी शिक्षकांना प्रशिक्षण देण्याचा कार्यक्रमही एआयसीटीईने तयार केला आहे. त्यासाठी काही व्हीडिओ तयार झाले आहेत, अशी डॉ. अभय करंदीकर यांनी दिली.

# सरकारची भूमिका मान्य न झाल्यास परवानगी मिळेल तेथे मतदान

## आरक्षण योग्यच असल्याचा मुद्दा केंद्र सरकार आज सुप्रीम कोर्टात मांडणार

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**



महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका 1994 पासून प्रचलित असलेल्या ओबीसी समुदायाला 27 टक्के आरक्षण देण्याच्या निर्णयानुसार होत असून 50 टक्के मर्यादा या पूर्वीही पाळली गेली नव्हती अशी भूमिका केंद्र सरकारचे सॉलिसिटर जनरल तुषार मेहता उद्या सर्वोच्च न्यायालयातील सुनावणी दरम्यान मांडणार आहेत असे विश्वसनीय रीत्या समजते. राज्य निवडणूक आयोग या प्रक्रियेकडे लक्ष ठेवत असून आदेशपालन ही त्यांची भूमिका असल्याचे समजते. सर्वोच्च न्यायालयाने हा युक्तिवाद मान्य न केल्यास जेथे 50 टक्क्यांची मर्यादा ओलांडली गेलेली नाही अशा ठिकाणी निवडणुका घेण्याची परवानगी दिली जाईल अशी अपेक्षा धरण्यात येते आहे. मर्यादा ओलांडू नका असे सांगितल्यास सध्या सुरू असलेल्या नगरपरिषदांमधील 16 टक्के निवडणुका रद्द कराव्या लागतील. या नगरपरिषद/ पंचायतींना स्थगिती देऊन कदाचित 84 टक्के निवडणूक प्रक्रिया सुरू राहील असा अंदाज व्यक्त केला जातो आहे. 50 टक्के आरक्षणाची मर्यादा ओलांडून जाणे अमान्य झाल्यास महाराष्ट्रातील 16 जिल्हा परिषदा तसेच दोन महानगरपालिकांमधील निवडणूक प्रक्रिया थांबू शकेल असेही सूत्रांनी स्पष्ट केले, मात्र या 16 ही ठिकाणी जिल्हा परिषद निवडणुका नव्या निकषाच्या आधारे पुढच्या दहा ते पंधरा दिवसांत होऊ शकतील अशीही माहिती समोर आली आहे. आरक्षण मर्यादा 50 टक्क्यांच्या आत आणल्याचे प्रारूप बदलणार नाही, मात्र आरक्षण प्रक्रिया वॉर्डनुसार पुन्हा करावी लागेल. त्यासाठी केवळ दहा ते बारा दिवसांचा कालावधी पुरेसा आहे. या कालावधीत निवडणुकांची घोषणा होऊन सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निकषानुसार 31 जानेवारीच्या आत निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईल, असा विश्वास व्यक्त केला जातो आहे. महानगरपालिकांबाबत 50% आरक्षण मर्यादा केवळ दोन ठिकाणी ओलांडली गेली असून त्या स्थितीत विदर्भातील नागपूर आणि चंद्रपूर येथील निवडणुका पुढे ढकलल्या जातील. ठाणे, पालघर, नाशिक, धुळे, नंदुरबार, जळगाव, हिंगोली, नांदेड, अमरावती, अकोला, वाशिम, बुलढाणा, यवतमाळ, चंद्रपूर, नागपूर आणि वर्धा या जिल्हा परिषदांमध्ये आरक्षणाला 50 टक्क्यांची मर्यादा ओलांडलेली आहे.

# सिडको वाळूज महानगरात चोरट्यांनी तीन घरे फोडली


**सिडको : (समर्थ गांवकरी)**

एकाच सोसायटीमधील तीन बंद घरे फोडून चोरट्यांनी रोख रकमेसह लाखो रुपयांचे सोन्याचे दागिने चोरून नेल्याची घटना मंगळवारी (दि.१८) सिडको वाळूज महागरातील पुष्पक रेसिडेन्सीमध्ये घडली. या भागात चोरट्यांकडून भरदिवसा तसेच रात्रीच्या वेळी बंद घरे टार्गेट केली जात असल्याने कामगारवर्गात भीतीचे वातावरण पसरले आहे. या विषयी पोलिसांनी सांगितले की, नारायण गडकर (३०, रा. पुष्पक रेसिडेन्सी, सिडको वाळूज महानगर-१) हे १८ नोव्हेंबर रोजी सकाळी साडेअकरा वाजेच्या सुमारास घराला कुलूप पत्नी कावेरी तीन वर्षांचा मुलगा अद्वेत यांना सोबत घेऊन त्यांची आई लताबाई यांना दवाखान्यात घेऊन गेले होते. यादरम्यान चोरट्यांनी गडकर यांच्या घराच्या दाराचे कुलूप तोडून बेडरूमधील कपाटातून १ तोळ्याचे सोन्याचे नेकलेस, ५ ग्रॅमची आंगठी, साडेतीन ग्रॅमची पोत व मणी असा जवळपास १ लाख ११ हजार ९४५ रुपये किमतीचा ऐवज चोरून नेला. त्याचबरोबर चोरट्यांनी गडकर यांच्या शेजारी राहणाऱ्या अमोल गाडेकर यांच्या दाराचा कडी-कोयंडा तोडून त्यांच्या घरातून रोख ३० हजार रुपये चोरले. त्यानंतर चोरट्यांनी आपला मोर्चा याच इमारतीत पहिल्या मजल्यावर राहणाऱ्या बाळासाहेब राऊत यांच्या घराकडे वळविला. त्यांच्या बंद घराच्या दाराचा कडी-कोयंडा तोडून घरातून साडेसात ग्रॅम वजनाचे झुंबर, अडीच ग्रॅमच्या दोन बाळ्या, दोन आंगठ्या, मंगळसूत्र असा जवळपास ८२ हजार ४३ रुपये किमतीचा ऐवज चोरून नेला. एकूण २ लाख २३ हजार ९८८ रुपये किमतीचा ऐवज चोरी प्रकरणी नारायण गडकर यांनी दिलेल्या तक्रारीवरून एमआयडीसी वाळूज पोलिस ठाण्यात अज्ञात चोरट्यांविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

# 'मोदी व्हिजन' पोहोचविण्यासाठी कटिबद्ध

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची ग्वाही

**जळगाव : (समर्थ गांवकरी)**



राज्यात आणि केंद्रात विकासाची कास धरलेल्या सरकारचे 'व्हिजन' भुसावळ शहरापर्यंत पोहोचवण्यासाठी तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दृष्टिकोनातून भुसावळचा चेहरामोहरा बदलण्यासाठी कटिबद्ध असून, निधीची कोणतीही कमतरता पडू देणार नाही, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भुसावळ येथे जाहीर प्रचार सभेत दिली. व्यासपीठावर मंत्री गिरीश महाजन, मंत्री संजय सावकारे, केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे, खा. स्मिता वाघ, सुरेश भोळे, मंगेश चव्हाण, अमोल जावळे, जिल्हाध्यक्ष राधेश्याम चौधरी, जिल्हाध्यक्ष चंद्रकांत बाविस्कर, साधना महाजन, रंजना सावकारे आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, पुढील पाच वर्षांसाठी शहराची धुरा कोणाकडे द्यायची, हे मतदारांनी ठरवायचे आहे. 'आम्ही सकारात्मक दृष्टीने जनतेसमोर आलो आहोत. विकासाचा एक सविस्तर आराखडा तयार केला असून, तो पूर्ण करण्यासाठी कटिबद्ध आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशातील शहरांचा विकास आणि साधण्याचे व्हिजन ठेवले आहे. हे व्हिजन आपल्या भुसावळपर्यंत आणणार असल्याचे त्यांनी सांगितले. भारतातील साडेसहा कोटी जनता सुमारे ४०० शहरांमध्ये राहते. म्हणजेच जवळपास ५० टक्के लोकसंख्या शहरी भागात आहे. यामुळेच शहरे मोठ्या प्रमाणावर दुर्लक्षित राहिल्याने ती बकाल झाली होती. ही परिस्थिती बदलण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदींनी लाखो कोटी रुपयांच्या योजना सुरू केल्या असून, आता हळूहळू शहरे बदलू लागली आहेत.





# राजमुद्रा करीअर ॲकॅडमीच्यावतीने यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार

## सातत्यपूर्ण ध्येय ठेवल्याने यश निश्चित-वसंत लोढा

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

राजमुद्रा करीअर अकॅडमीच्या विद्यार्थ्यांनी चांगला अभ्यास करून विविध क्षेत्रातील निवड भरती प्रक्रियेत उल्लेखनीय कामगिरी केली आहे. भारतीय सैन्यदलात ही आतापर्यंत अकॅडमीचे अनेक विद्यार्थी निवडले गेले आहेत. देशसेवा व राष्ट्रसेवा डोळ्यासमोर ठेवून हे विद्यार्थी पुढे जात आहेत. तसेच सातत्यपूर्ण ध्येय ठेवल्याने यश निश्चित मिळाले आहे.असे प्रतिपादन पंडित दीनदयाळ परिवार प्रतिष्ठानचे संस्थापक वसंत लोढा यांनी केले आहे. जय जिजाबाई महिला बहुउद्देशीय महिला बहुउद्देशीय शिक्षण संस्था संचलित राजमुद्रा करिअर अकॅडमी यांच्या संयुक्त विद्यमाने भारतीय सैन्य दल,

जिल्हा सहकारी बँक व महानगरपालिका भरती प्रक्रियेत गुणवत्तापूर्वक निवड झालेल्या यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार पं. दीनदयाळ परिवार प्रतिष्ठानचे संस्थापक वसंत लोढा यांच्या हस्ते करण्यात आला.याप्रसंगी सचिव बाळासाहेब भुजबळ, कार्याध्यक्ष सुरज अग्रवाल, सेवानिवृत्त पोलीस उपाधीक्षक अविनाश बुधवंत, राजमुद्रा करीअर अकॅडमीच्या संचालीका सौ.नंदाताई पांडुळे आदींसह विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



प्रास्ताविकात सौ.नंदाताई पांडुळे म्हणाले,ग्रामीण भागातून स्वप्न घेऊन विद्यार्थी अकॅडमी प्रवेश घेत असतात.जिद्द,चिकाटी व परिश्रमाने मेहनत घेऊन विद्यार्थ्यांनी परीक्षेला सामोरे जाऊन यश मिळविले आहे. राजमुद्रा अकॅडमीतील विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन मिळाल्याने भारतीय सैन्य दल, जिल्हा बँक व महानगरपालिकेच्या निवड भरती प्रक्रियेत घवघवीत यश मिळाले आहे. मान्यवरांच्या हस्ते अकॅडमीचे यशस्वी विद्यार्थी शुभम सांगळे,तुषार तीपुळे, श्याम वामन,ओमकार बळे,अनिकेत वामन ,संदीप वाणी ,गौरव हांडे,विशाल रक्ताटे यांचा विशेष सत्कार करण्यात आला.या कार्यक्रमासाठी विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



भिवंडी : गावाच्या सर्वांगीण आणि गतिमान विकासाचे ध्येय ठेवत भिवंडी तालुक्यातील चिराडपाडा येथिल ग्रामस्थांनी स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापनेसाठी एकमुखी निर्णय घेतला आहे. सरपंच रिंकल पाटील यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा परिषद शाळेत आयोजित विशेष ग्रामसभेत स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापनेचा प्रस्ताव बहुमताने मंजूर करण्यात आला. अनेक वर्षांपासूनची ग्रामस्थांची मागणी आता प्रत्यक्षात येण्याच्या मार्गावर आहे. एकजुटीने विशेष ग्रामसभा पार पडली ,सोमवारी झालेल्या या सभेत ग्रामविकास अधिकारी काशीनाथ माळी आणि ग्रामसेवकांच्या उपस्थितीत ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला.

## थोडक्यात बातम्या...



### नगर- गोंदवले दिंडीचे वृत्तपत्र विक्रेत्यांच्या वतीने उत्साहात स्वागत

**अहिल्यानगर (स. गांवकरी) :** सावेडी उपनगरातील शिलाविहार येथील श्री.ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज सेवाभावी मंडळातर्फे सालाबादप्रमाणे यंदाही नगर–गोंदवले दिंडीचे भव्य आयोजन करण्यात आले. दिंडीचे प्रस्थान रविवारी सकाळी भक्तीमय वातावरणात झाले. पहाटे श्रींच्या पादुकांवर अभिषेक केल्यानंतर त्या पालखीत स्थापित करण्यात आल्या. पादुकांची पूजा माजी नगरसेवक निखिल वारे यांच्या हस्ते संपन्न झाली. शिलाविहार येथुन प्रस्थान झाल्यानंतर वारकऱ्यांच्या सेवेसाठी विविध समाजसेवेच्या पुढाकारांचा समावेश होता. कोठला चौकात खांडरे परिवाराच्या वतीने सर्व वारकऱ्यांना चहा–बिस्कीटे वाटप करण्यात आले. पुढे कायनेटिक चौकात वृत्तपत्र विक्रेत्यांच्या वतीने दिंडीचे स्वागत करण्यात आले. वृत्तपत्र विक्रेत्यांनी वारकऱ्यांचे सत्कारपूर्वक स्वागत करून त्यांना आर्थिक योगदान देत सहकार्य केले.या उपक्रमामुळे सामाजिक बांधिलकीची जाणीव पुन्हा दृढ झाली. या प्रसंगी वृत्तपत्र विक्रेता संघटनेचे उपाध्यक्ष संजय गोरे, प्रमोद पंतम,शरद बेरड, सुभाष काकडे, प्रमोद पाठक, राहुल लिमये प्रसिद्ध प्रमुख विजय मते आदी पदाधिकारी व विक्रेते उपस्थित होते. तसेच सुभाष लुणीया परिवाराच्या वतीने सर्व वारकऱ्यांसाठी अल्पोपहाराचे आयोजन करण्यात आले.



### बुधवारी हंगा येथे संविधान दिन व संविधान सन्मान संमेलनाचे आयोजन

**पारनेर (स. गांवकरी) :** भारतीय लोकशाहीचा आधारस्तंभ असलेल्या संविधानाबद्दल जनजागृती करण्यासाठी आणि संविधानिक मूल्यांचा सन्मान करण्यासाठी पारनेर तालुक्यातील हंगा येथे संविधान दिन व संविधान सन्मान संमेलनाचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. ग्रामपंचायत हंगा आणि संविधान जनजागृती अभियान यांच्या संयुक्त विद्यमाने हे संमेलन बुधवार, दि. २६ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी दहा वाजता हंगा येथील सामाजिक सभागृहात होणार आहे. भारतामध्ये दरवर्षी २६ नोव्हेंबर हा दिवस ‘संविधान दिन’ म्हणून साजरा केला जातो, कारण याच दिवशी १९४९ मध्ये भारतीय संविधानाचा स्वीकार करण्यात आला होता. या ऐतिहासिक दिनाचे औचित्य साधून आयोजित करण्यात आलेले हे संमेलन पंचक्रोशीतील संविधानप्रेमींसाठी एक महत्त्वपूर्ण पर्वणी ठरणार आहे.या महत्त्वपूर्ण संमेलनासाठी परिसरातील अनेक महत्त्वाचे राजकीय आणि सामाजिक मान्यवर उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी हंगाचे माजी सरपंच राजेंद्र शिंदे असणार आहेत. या संमेलनास विशेष उपस्थिती म्हणून खासदार डॉ. निलेश लंके यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. त्यांच्यासोबतच माजी जिल्हा परिषद सदस्य राणीताई लंके, सरपंच सुलोचना राजेंद्र लोंढे, उपसरपंच रुपालीताई सोपान दळवी, ग्रामविकास अधिकारी बी टी शेटेवाड, तसेच सर्व ग्रामपंचायत सदस्य, चेअरमन, व्हा. चेअरमन आणि संचालक मंडळ यांची सन्माननीय उपस्थिती राहणार आहे.

# स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक : जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांचे आवाहन

## उमेदवारांनी इलेक्ट्रॉनिक जाहिरातींचे प्रमाणीकरण करून घेणे आवश्यक

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

जिल्ह्यातील कोपरगाव, संगमनेर, श्रीरामपूर, जामखेड, शेवगाव, पाथर्डी, राहाता, राहुरी, देवळाली प्रवरा, शिर्डी व श्रीगोंदा नगरपरिषद तसेच नेवासा नगरपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी निवडणूक प्रक्रियेला सुरुवात झाली आहे. या निवडणुकीसाठी निवडणूक लढविणाऱ्या सर्व उमेदवारांनी इलेक्ट्रॉनिक जाहिराती प्रसारणापूर्वी जिल्हास्तरीय माध्यम प्रमाणन व नियंत्रण समितीकडून इलेक्ट्रॉनिक जाहिरातींचे प्रमाणीकरण करून घेणे आवश्यक आहे, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हास्तरीय माध्यम प्रमाणन व नियंत्रण समितीचे अध्यक्ष डॉ.पंकज आशिया यांनी केले आहे.



राज्य निवडणूक आयोगाने जिल्ह्यातील ११ नगरपरिषद व १ नगरपंचायत निवडणुकीसाठी निवडणूक कार्यक्रम जाहीर केला असून आजपासून उमेदवारी अर्ज भरण्यास सुरुवात झाली आहे. या निवडणुकीसाठी संबंधित अधिनियमांतर्गत प्रसिद्ध करण्यात आलेल्या आदेश व सूचनांनुसार उमेदवारांनी कार्य करणे आवश्यक आहे.

सर्व प्रकारच्या इलेक्ट्रॉनिक माध्यमांद्वारे प्रसारित किंवा प्रसिद्ध करण्यात येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूक विषयक प्रस्तावित जाहिरातींचे प्रमाणीकरण समितीकडून पूर्व प्रमाणन करून घेणे आवश्यक आहे. इलेक्ट्रॉनिक माध्यमांमध्ये दूरदर्शन, उपग्रह वाहिन्या, केबल वाहिन्या, यूट्यब वाहिन्या, केबल नेटवर्क, आकाशवाणी, खासगी एफ.एम. वाहिन्या, चित्रपटगृहे, बल्क एस.एम.एस., व्हॉइस एस.एम.एस., संकेतस्थळे आदींचा समावेश होतो.

समाजमाध्यमे (सोशल मीडिया) यात इंटरनेटद्वारे वापरली जाणारी संवादाची व माहितीची व्यासपीठे समाविष्ट होतात, ज्याद्वारे लोक एकमेकांशी संवाद साधतात, माहिती शेअर करतात, प्रतिक्रिया व्यक्त करतात, मते किंवा विचार मांडतात आणि विविध प्रकारची माहिती (फोटो, व्हिडिओ, लेख, बातम्या) इतरांपर्यंत पोहोचवतात. उदा. एक्स (पूर्वीचे ट्विटर), फेसबुक, लिंक्डइन, व्हिडिओ शेअरिंग प्लॅटफॉर्म्स, मायक्रो ब्लॉगिंग साइट्स, मेसेजिंग ॲप्स (व्हॉटसअ‍ॅप, टेलिग्राम) तसेच कोलॅबोरेटिव्ह टूल्स (विकी, डिस्कशन फोरम्स) इत्यादींचा समावेश होतो. जिल्हास्तरीय माध्यम प्रमाणन व नियंत्रण समितीत जिल्हाधिकारी हे अध्यक्ष आहेत. या समितीत पोलीस अधीक्षक किंवा त्यांचे प्रतिनिधी, जिल्हाधिकारी यांनी प्राधिकृत केलेला अपर जिल्हाधिकारी अथवा उपजिल्हाधिकारी दर्जाचा अधिकारी, संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी, संबंधित तहसीलदार अथवा नगरपरिषद/ नगरपंचायतीचे मुख्याधिकारी हे सदस्य, तर जिल्हा माहिती अधिकारी हे सदस्य सचिव आहेत.

निवडणूक लढविणाऱ्या प्रत्येक उमेदवाराने इलेक्ट्रॉनिक जाहिराती प्रसारित करण्यापूर्वी प्रमाणीकरण करून घेण्यासाठी त्या जाहिराती जिल्हा माहिती अधिकारी (जिल्हा माहिती कार्यालय, अहिल्यानगर मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, पहिला मजला, आकाशवाणी केंद्रासमोर, सावेडी रोड, अहिल्यानगर) यांच्याकडे सादर कराव्यात. प्रस्तावित जाहिरात प्रसारित किंवा प्रसिद्ध करण्याच्या दिनांकापूर्वी किमान पाच दिवस आधी संबंधित समितीकडे तिच्या प्रमाणीकरणासाठी अर्ज करावा लागेल. पूर्व प्रमाणीकरणाच्या अर्जासोबत जाहिरातीची इलेक्ट्रॉनिक स्वरूपातील प्रत व राजकीय पक्षाच्या पदाधिकाऱ्याने किंवा उमेदवाराने साक्षांकित केलेल्या जाहिरात संहितेच्या दोन मुद्रीत प्रती जोडाव्यात, असेही आवाहनही जिल्हाधिकारी डॉ.पंकज आशिया यांनी केले आहे.



# शिवसैनिकांचा राष्ट्रवादी अजितदादा पवार गटात पक्षप्रवेश

**चिपळुण : (समर्थ गांवकरी)**

चिपळूण तालुक्यातील कोकरे जिल्हापरिषद गटात उबाठाला राष्ट्रवादी अजितदादा पवार पक्षाने जोरदार धक्का दिला आहे.गत कित्येक वर्षे पक्षाशी एकनिष्ठ असणाऱ्या असुर्डे बनेवाडी येथील शेकडो ग्रामस्थांनी राष्ट्रवादी अजितदादा पवार पक्षात आज जाहीर प्रवेश केला असून उबठाला हा जोरदार धक्का मानला जात आहे तर ऐन निवडणुकीच्या तोंडावरच हा प्रवेश घडल्याने राष्ट्रवादीला मजबूत बळ प्राप्त झाले असून उबठामध्ये प्रचंड खळबळ उडाली आहे.

# महाराष्ट्र राज्य पत्रकार संघातर्फे लहू गांगड यांचा सत्कार!

**अकोले : (समर्थ गांवकरी)**

अकोले तालुक्यातील देवठाण (सध्या, जवळे कडलग) गावातील कु. लहू रखमा गांगड या प्रतिभावान युवकाची भारतीय सैन्य दलात नुकतीच निवड झाली असून, या यशामुळे संपूर्ण परिसरात आनंदाचे व उत्साहाचे वातावरण आहे. अतिशय गरीब कुटुंबातील असलेल्या लहू यांनी जिद्द, चिकाटी आणि कठोर परिश्रमाच्या जोरावर आपले स्वप्न साकार करत गावाचे नाव उज्ज्वल केले आहे.



कठीण परिस्थितीशी दोन हात करत मिळवलेले हे यश पाहता, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ राज्य सरचिटणीस डॉ. विश्वासराव आरोटे यांच्या मार्गदर्शनाखाली, संघाचे तालुका अध्यक्ष अशोकराव उगले यांनी पुष्पगुच्छ देऊन लहू गांगड यांचे अभिनंदन केले.

यावेळी बोलताना अशोकराव उगले म्हणाले, “आता तुमची जबाबदारी देशाची आहे. तुम्ही मातृभूमीसाठी लढणारे खरे वीर सैनिक आहात. तुमच्या उज्ज्वल भवितव्यासाठी मनःपूर्वक शुभेच्छा!”

कार्यक्रमास प्रगतशील शेतकरी सुनील उगले,सोमनाथ उगले, रखमा गांगड, हौशीराम गांगड, किरण गांगड, अंकुश गांगड, प्रशांत गांगड, प्रतिक गांगड, राहुल भुतांबरे आदी मान्यवर उपस्थित होते. लहू गांगड यांच्या या उपलब्धीने अकोले तालुक्याचा अभिमान वाढवला असून, युवकांसाठी प्रेरणादायी उदाहरण ठरले आहे.

# पालकमंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांनी घेतले आनंदऋषीजी म.सा.समाधीचे दर्शन

**अहिल्यानगरः (समर्थ गांवकरी)**

जैन धार्मिक परीक्षा बोर्ड येथे पालकमंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांनी सदिच्छा भेट देऊन आनंदऋषीजी म.सा. यांच्या समाधीचे दर्शन घेतले.

याप्रसंगी महाराष्ट्र प्रवर्तक कुंदनऋषीजी म.सा.,उपाध्याय पुज्य प्रविण ऋषीजी म.सा.,तिर्थेश ऋषीजी म. सा. ,अलोकऋषीजी म. सा. ,चातुर्मास कमिटी २०२६ चे सदस्य बाबुशेठ बोरा,अनिल पोखरणा,सचिन देसरडा,आदेश चंगेडिया,विलास कटारिया, विनायकराव देशमुख, भाजपाचे शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते, सुरेश कांकरिया,विजय गुगळे, पंकज भाऊ फुलपगर,शिवाजी आढाव,नाथाभाऊ,भाऊ नरवडे आदी उपस्थित होते.



आनंदऋषीजी म.सा.यांची दीक्षाभूमी असलेले मिरी येथील जागा महाराष्ट्र शासनाकडून जैन समाजाला मिळावी.या मागणी साठी माजी राज्यमंत्री स्व. शिवाजीराव कर्डिले व पालकमंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांनी वेळोवेळी सरकारकडे पाठपुरावा केला आहे.आता ही जबाबदारी आपणावर आली आहे. तसेच पांढरीपुल येथून चिचोंडी आनंदऋषीजी म.सा.यांच्या समाधी स्थळाकडे जाणारा रस्ता खराब असल्याने येथे देशभरातून येणाऱ्या भाविकांची मोठी गैरसोय होत आहे.येथील रस्ता लवकरात लवकर दुरुस्त करून द्यावा. तसेच आनंदऋषीजी म.सा.यांची दीक्षाभूमी असलेली मिरी येथील जागा जैन समाजाला धार्मिक कार्यासाठी उपलब्ध करून द्यावी. अशी मागणी जैन समाजाच्या वतीने करण्यात आली आहे.

पालकमंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील म्हणाले,उपाध्याय प.पु.प्रवीण ऋषीजी म.सा.यांच्या धार्मिक सत्संगामुळे प्रभावित होऊन जैन समाजाचे तीर्थक्षेत्र पालितान येथे जाऊन दर्शन घेतले आहे.जैन तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात गोशाळा आहेत.गौसेवेचे कार्य सुरू आहे.आनंदऋषीजी म.सा. यांचे जन्मगाव असलेले पवित्र तीर्थक्षेत्र असणारे चिचोंडी येथील रस्त्याचे काम लवकरात लवकर मार्गी लावू तसेच मिरी येथील दिक्षाभूमीची जागा जैन समाजाला धार्मिक कार्यासाठी उपलब्ध करून देण्यासाठी सरकारकडे पाठपुरावा करू.असे आश्वासन नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिले आहे.तसेच महाराष्ट्र प्रवर्तक कुंदनऋषीजी म.सा.यांचे दर्शन घेऊन त्यांच्या तब्येतीची विचारपूस केली.यावेळी जैन समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# रस्त्याचे कॉँक्रीटीकरण काम कॉलनीच्या विकासातले महत्त्वाचे पाऊल

## भाजपा शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते : कॉलनीतील अंतर्गत रस्त्यांचे कॉँक्रीट रस्ता पूर्ण; नागरिकांनी व्यक्त केला आनंद, नव्या रस्त्यांनी घेतला विकासाचा वेग

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील व डॉ .सुजय विखे यांच्या विशेष प्रयत्नातून मंजूर झालेल्या विकास कामाचे उद्घाटन भाजपा शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी समवेत माजी महापौर बाबासाहेब वाकळे, शिवाजी कराळे, माजी नगरसेवक मनोज दुल्लम, तायगा शिंदे, उदय कराळे, भाजपा युवामोर्चा उपाध्यक्ष करन कराळे,रामदास आंधळे,पुष्कर कुलकर्णी, बाळासाहेब गायकवाडनितीन शेलार,प्रिया जानवे, विलास ताठे संपत नलावडे सतिश शिंदे संतोष धोंगडे,शैलेश राजगुरू,मन्नुशेठ ग्राबा,कांबळे,भाटे आदी मान्यवर उपस्थित होते. सदर काम बडोदा बँक कॉलनी ते बिपाशा अपाटमेंट, गुल मोहोर रोड रस्त्याचे कॉँक्रीटकरण पूर्ण झाले आहे.



अनिल मोहिते म्हणाले आता रहिवाशांना सुरक्षित, सपाट व दर्जेदार रस्त्याचा लाभ मिळू लागला आहे. अनेक वर्षांपासून खड्डे, चिखल व खराब स्थितीमुळे नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत होता. रस्त्याचे कॉँक्रीटीकरण हाती घेतल्याने आता कॉलनीचा चेहरामोहरा बदलला आहे.संबंधित विभागाच्या दक्ष देखरेखीखाली अत्यंत दर्जेदार पद्धतीने हे काम पूर्ण करण्यात आले. कॉलनीतील अंतर्गत रस्त्यांचे कॉँक्रीटीकरण पूर्ण होताच परिसराचा चेहरामोहरा अक्षरशः बदलून गेला आहे. खड्डे, चिखल आणि धुळीने भरलेले रस्ते आता भक्कम आणि सपाट बनल्याने संपूर्ण कॉलनीत नवचैतन्य संचारले आहे. हे काम ‘कॉलनीच्या विकासातले महत्त्वाचे पाऊल आहे. पालकमंत्री विखे यांनी जलसंपदा खात्याच्या माध्यमातून नदीजोड वैतरणाचे पाणी गोदावरी खोऱ्यात वळवायचे हा नदीजोड प्रकल्पात १५ टीएमसी पाणी आपल्या मुळा डॅममध्ये वळवले आहे मुळा धरणाची उंची वाढवणे त्या माध्यमातून अहिल्यानगर शहरात नागरिकांची गरजा भागवण्याचे काम आपण करत आहोत.

करन कराळे म्हणाले “पूर्वी पावसाळ्यात चिखलाचे साम्राज्य आणि उन्हाळ्यात धुळीचा मारा असायचा; आता मात्र हे मजबूत रस्ते नागरिकांच्या प्रत्येक पावलाला सुरक्षित दिशा देणार आहेत. हा बदल फक्त रस्त्यांचा नाही, तर संपूर्ण कॉलनीच्या जीवनमानाचा आहे.

आज या अंतर्गत रस्त्यांनी नव्या उजेडाने उजळून निघाले आहेत. अनेक वर्षांच्या प्रतीक्षेला आता प्रत्यक्ष विकासाचा ठोस आकार मिळाला आहे. दैनंदिन जीवनाला आधार देणारे हे रस्ते आता कॉलनीच्या प्रगतीचा मार्ग प्रशस्त करतील.”

रस्ता पूर्ण झाल्याने वाहतूक सुकर झाली असून पावसाळ्यातील त्रासही टळणार आहे.

मुलांना शाळेत जाणे, महिलांना बाजारात जाणे तसेच आपत्कालीन वाहनांची हालचाल अधिक सोयीस्कर होणार आहे, अशी प्रतिक्रिया नागरिकांनी दिली. नवीन रस्ता हा परिसराच्या विकासाला चालना देणारा ठरेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. यावेळी मोठया संख्येने नागरिक उपस्थित होते.

# मुरबाड तालुक्यात आरटीई कायद्याची पायमल्ली



**मुरबाड : (समर्थ गांवकरी)**

तालुक्यातील अनेक शाळांमध्ये आरटीई कायद्याची पायमल्ली होताना दिसत असून त्वरित अशा शाळांवर कारवाई करण्यात यावी यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने आज मुरबाड पंचायत समिती कार्यालयासमोर आंदोलन करण्यात आले.

बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ मधील कलम १२ (१) (सी) नुसार वंचित, दुर्बल व सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्ग घटकातील मुलांना २५ टक्के प्रवेश राखीव ठेवण्याची तरतूद कायद्याने दिला आहे. मुरबाड तालुक्यातील अनेक शाळा विद्यार्थ्यांना आरटीई योजने अंतर्गत शाळेमध्ये मोफत प्रवेश देतात. मात्र विद्यार्थ्यांना व त्यांच्या पालकांना सांगण्यात येते की या योजने मध्ये फक्त फी माफ केली जाते.मात्र कायद्याने ज्या विद्यार्थ्यांना आरटीई अंतर्गत शाळांत प्रवेश देऊन योजनेचा लाभ दिला जातो, त्यांचा सर्व शैक्षणिक खर्च, फी माफ तसेच शिक्षणासाठी लागणारा सर्व खर्च शासन संबधित शाळेला प्रशासना च्या माध्यमातून देण्यात येतो, मात्र अनेक शाळा विद्यार्थी व पालकांची तसेच प्रशासनाची दिशाभूल करतात फक्त शालेय फी माफ करून किंवा काही प्रमाणात फी मध्ये सूट देण्यात येते, मात्र शिक्षणासाठी लागणारे साहित्य शाळेतून किंवा बाहेरून पैसे देऊन घ्यायला सांगतात. मुरबाड तालुक्यातील अनेक शाळा आरटीई कायद्याचा उलंघन करतात त्यामुळे आरटीई कायदा लागू झाल्यापासून म्हणजेच 2009 ते 2025 पर्यंत चे मुरबाड तालुक्यातील पात्र विद्यार्थी यांना आरटीई योजने अंतर्गत सर्व सुविधा देण्यात आल्या आहेत की नाही यांची सखोल चौकशी करून कायद्याची काटेकोर पणे अंमलबजावणी न करणाऱ्या संबंधित दोषी शाळांवर दंडात्मक कारवाई तसेच संबंधित शाळा यांची मान्यता कायमची रद्द करण्याची कारवाई करण्यात यावी तसेच मुरबाड तालुक्यातील ज्या शाळांनी आरटीई योजनेचे 2009 ते 2025 पर्यंतचे पात्र विद्यार्थी यांची आर्थिक लूट केली आहे.



(पाचोरा) मालेगाव तालुक्यातील डोंगराळे गावात साडे तीन वर्षांच्या निरागस चिमुकलीवर झालेल्या अमानुष अत्याचारानंतर तिची निर्घृण हत्या झाल्याची धक्कादायक घटना प्रकाशात आल्यानंतर सर्वत्र संतापाची लाट उसळली आहे. समाजमन हादरवून टाकणाऱ्या या जघन्य कृत्याचा निषेध करत आरोपीला तात्काळ अटकेनंतर फाशीची शिक्षा देण्याची मागणी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या पदाधिकाऱ्यांनी केली आहे. या संदर्भात पत्रकार संघाच्या प्रतिनिधींनी पाचोरा पोलिस निरीक्षकांना निवेदन सादर केले. या निवेदनात अशा प्रकारचे पाशवी अपराध करणाऱ्या नराधमांना कठोरात कठोर शिक्षा न झाल्यास समाजात भीतीचे वातावरण निर्माण होणार नसल्याचे नमूद करण्यात आले आहे. फाशीची शिक्षा दिल्यास अशा घटनांना मोठा प्रतिबंध बसेल, असे मत प्रतिनिधींनी व्यक्त केले.

## थोडक्यात बातम्या...




### डॉ. पूर्विता वाकचौरेच्या टिमची ऑस्कर बुक रेकॉर्डमध्ये होणार नोंद

■ वैद्यकीय क्षेत्रात पूर्वीताने केले जागतिक रेकॉर्ड

**कोतुळ (स. गांवकरी) :** कळस ता,अकोले गावची सुकन्या डॉ. पूर्विता वाकचौरे हिच्या नेतृत्वाखालील टीम ने अत्यंत कमी वेळात सर्वाधिक दंत तपासणी चे जागतिक रेकॉर्ड केले असून याची दखल ऑस्कर बुक रेकॉर्ड ने आता घेतली आहे. कर्नाटक राज्यातील बंगलोर येथे आयोजित या जागतिक रेकॉर्ड साठी 7 तासात 50,000 दंत तपासणी चे उद्दिष्ट असताना या टीमने 6 तासातच 56,600 व्यक्तींची दंत तपासणी केली. या मध्ये वेगवेगळ्या 90 ठिकाणी कॅम्प आयोजित केले होते, त्यामध्ये 100 दंत डॉक्टरांनी यांनी सहभाग घेतला होता. या सर्व टीमचे नेतृत्व डॉ. पूर्विता वाकचौरे हिने केले. डॉ. पूर्विता वाकचौरे हिला कामगिरी बद्दल ऑस्कर बुक रेकॉर्ड ने शानदार समारंभात सन्मान चिन्ह, प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. डॉ.पूर्विता वाकचौरे ही जिल्हा परिषद चे अर्थ व बांधकाम समिती अकोले चे माजी सभापती व माजी मंत्री, व विरोधी पक्षनेते (स्वर्गीय) मधुकरराव पिचड यांचे निकट वर्तीय,मा,श्री कैलासराव वाकचौरे यांची कन्या असून ती अहिल्यानगर जिल्ह्यातील कळस ता, अकोले येथील रहिवासी आहे तिचे वैद्यकीय शिक्षण डी वाय पाटील मेडिकल कॉलेज पुणे इथे झाले आहे. तिच्या या यशाचे माजी आमदार मा,वैभव पिचड, आमदार मा,डॉ किरणजी लहामटे , पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस मा,डॉ,विश्वासराव आरोटे, जिल्हा प्रसिद्धी प्रमुख भाऊसाहेब वाकचौरे , पत्रकार संघाचे मा,उपाध्यक्ष अशोकराव शेळके, व जिल्ह्यातील सर्व पत्रकार आदींनी अभिनंदन केले आहे, व तसेच उल्लेखनीय कार्याबद्दल वैद्यकीय क्षेत्रातून राज्य भरातून सर्वत्र स्वागत व अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

### गणेश कृपा ओनर्स वेल्फेअर असोसिएशनचा उद्घाटन समारंभ संपन्न



**ठाणे (स. गांवकरी) :** चिंचपाडा, ऐरोली येथे गणेश कृपा ओनर्स वेल्फेअर असोसिएशनचा भव्य उद्घाटन समारंभ शिवसेना उपनेते माननीय विजयजी चौगुले यांच्या हस्ते संपन्न झाला. मोठ्या उत्साहात आणि शिस्तबद्ध वातावरणात हा सोहळा पार पडला. कार्यक्रमावेळी अमित चौगुले, शुभम चौगुले, अमित चौगले, लक्ष्मण भेरे, राजेंद्र भोसले (शाखा प्रमुख), शिवशंकर सिंह, रमेश जगदाळे, शाहीर यांनी प्रमुख उपस्थिती लावून उद्घाटनाला ऐतिहासिक रंग भरला. या आयोजनाची सूत्रे असोसिएशनचे नवनिर्वाचित अध्यक्ष महेंद्र उगले यांनी समर्थपणे हाती घेतली. त्यांना उपाध्यक्ष बापू देशमुख, दिलीप मुळीक, सचिव लक्ष्मण गंधाले, राजेंद्र भोसले शाखाप्रमुख आणि खजिनदार महेश सावंत यांनी उत्तम सहकार्य दिले. तसेच महिला आणि युवा सेना कमिटीतील निखिल देशमुख, अक्षय मराठे तसेच कमिटीतील सर्व मान्यवर सदस्यांनीही कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मोलाचे योगदान दिले. उद्घाटन सोहळा ऐक्य, सहकार्य आणि सामाजिक बांधिलकीचे उदाहरण ठरला.

# आदिवासी अतिदुर्गम सातेवाडीत विद्यार्थ्यांना ५० सायकलींचे मोफत वाटप!

## पहिल्यांदाच सायकल मिळाल्याचा आनंद विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर खुलला!



**अकोले : (समर्थ गांवकरी)**

अहिल्यानगर जिल्ह्यातील अतिदुर्गम सातेवाडी परिसरातील विद्यार्थ्यांसाठी मोठा दिलासा ठरलेल्या सायकल वाटप कार्यक्रमाचे आयोजन रविवार, दि. २३ नोव्हेंबर २०२५ रोजी करण्यात आले. स्व. बाबुराव सखाराम बोऱ्हाडे (बी.एस.बी.) एज्युकेशनल संस्था, उल्हासनगर-४ संचालित न्यू इंग्लिश स्कूल, जांभळेवाडी (सातेवाडी), ता. अकोले येथे सकाळी ११ ते १.३० या वेळेत विद्यार्थ्यांना ५० मोफत सायकलींचे वाटप करण्यात आले.

हा उपक्रम मा. श्री. नामदेव गवळी (पोस्टमन, वाघोली पुणे), सामाजिक कार्यकर्ते मा. श्री. अमोल जगताप आणि आदिवासी सेवक पुरस्कार प्राप्त मा. श्री. दत्तात्रय मुठे (फोफसंडी) यांच्या संयुक्त सहकार्यातून राबविण्यात आला.

येसरठाव, खेतेवाडी, पोटकरवाडी, मोरवाडी, गांजविहीर, खवटी, त्रिशूळवाडी आणि जांभळेवाडी अशा दुर्गम डोंगराळ भागांतून विद्यार्थी रोज ६-७ किमी पायी वाट काढत शाळेस येतात. गावात एस.टी. ची सुविधा नसल्याने शिक्षणात खंड पडण्याची शक्यता निर्माण होत होती.

सायकली मिळताच विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद फैलावला. तालुक्यात प्रथमच एवढ्या मोठ्या प्रमाणात सायकलींचे मोफत वाटप झाल्याची परिसरात मोठी चर्चा आहे.

या प्रसंगी मान्यवरांनी विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले. स्व. बाबुराव सखाराम बोऱ्हाडे (बी.एस.बी.) एज्युकेशनल संस्थेचे कार्यकारी संचालक श्री. प्रतिक बोऱ्हाडे यांनी विद्यार्थ्यांनी मिळालेल्या सायकलींची जाणीव ठेवून भविष्यात समाजासाठी योगदान देण्याचे आवाहन केले. तसेच सर्व सामाजिक कार्यकर्त्यांचे आभार मानले.

उपस्थित मान्यवर:
कार्यक्रमाला,
श्री. झांजे साहेब – ॲसिस्टंट मॅनेजर, विप्रो मुंबई.
श्री. केशव बुळे – सरपंच, सातेवाडी.
थी. देशमुख – बी.के. संस्था निरीक्षक.
श्री. आरोटे आर.एल. – मुख्याध्यापक, सावरकुटे.
श्री. पवार ए.के. – संस्था समन्वयक.
सौ. रोहिणीताई गभाले – उपसरपंच.
श्री. मारुती मुठे – माजी सरपंच.
लक्ष्मण मुठे, ज्ञानदेव मुठे.
शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष श्री. जानिकनाथ मुठे.
श्री. रंगनाथ मुठे, काशिनाथ दिघे, शिवराम दिघे.
तसेच शिक्षकवर्ग : थी. देशमुख एस.एम., श्री. काळेसर, श्री. डाकेसर, श्रीमती खुर्पे मॅडम.
सूत्रसंचालन : थी. काळे एच.बी. व श्रीम. खुर्पे एस.ए.
पालक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या उपक्रमामुळे अतिदुर्गम भागातील विद्यार्थ्यांना मिळालेली ही सायकल शिक्षणाच्या दिशेने नवी क्रांती ठरेल, असा विश्वास व्यक्त होत आहे.

# शिक्षिका रेगडे व विद्यार्थीनी माकर यांचा गुणगौरव

**शिवनेरी : (समर्थ गांवकरी)**

पुणे जिल्हा परिषद व अमरेंद्र भास्कर बालसाहित्य संस्था पुणे आयोजित विद्यार्थी साहित्य संमेलन २०२५ रोजी जुन्नर तालुक्यातील पिंपळगाव तर्फे नारायणगाव रामोसवाडी शाळेतील आदर्श शिक्षिका जयश्री रेंगडे यांचा उत्कृष्ट साहित्य लेखन केल्याबद्दल बालगंधर्व रंगमंदिर पुणे येथे प्रशस्तीपत्रक स्मृतीचिन्ह देऊन गौरविण्यात आले . आदर्श शिक्षिका जयश्री रेंगडे बालसाहित्य स्पर्धेत त्याच्या मराठीची थोरवी या कवितेची उत्कृष्ट साहित्य कृतीमध्ये निवड करण्यात आली. तसेच अनुष्का रमेश माकर इयत्ता ४ थी चा विद्यार्थी ५ च्या गटात हस्ताक्षर स्पर्धेत जिल्ह्यात २ क्रमांक पटकाविला त्याबद्दल पुणे येथे मान्यवरांच्या उपस्थितीत सत्कार करण्यात आला. त्यावेळी अप्पर जिल्हाधिकारी सतिश राऊत, मुख्य. कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, ज्येष्ठ साहित्यिक न. म. जोशी , बाल साहित्यिक लक्ष्मीकांत देशमुख जेष्ठ , अमरेंद्र भास्कर बालकुमार साहित्य संस्था अध्यक्ष राजन लाखे , जुन्नर तालुका गटशिक्षणाधिकारी अशोक लांडे व केंद्रप्रमुख गुंजाळवाडी शोभा डोंगरे इतर मान्यवर उपस्थित होते.

# मुल्यवर्धीत शिक्षणामुळे मुले सुसंस्कृत बनतात

■ रमेश बागुल : मुल्यवर्धन प्रशिक्षणाचा दुसरा टप्पा सुरु



**वैजापुर : (समर्थ गांवकरी)**

विद्यार्थांमध्ये निर्माण होणारी नकारत्मक भावना, त्यांच्यात दिसणारा संस्काराचा अभाव यासर्व बाबींसाठी त्यांना मुल्यवर्धाति शिक्षण गरजेचे आहे कारण त्यामुळे ते सुसंस्कृत बनत असतात असे मत शिक्षकांना मार्गदर्शन करतांना प्रशिक्षण समन्वयक रमेश बागुल यांनी व्यक्त केले. येथील करुणा निकेतन प्राथ प्रशालेत शांतीलाल मुथा फौंडेशन, एसईआरटी पुणे, महाराष्ट्र शासन व डायट छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने व गटशिक्षणाधिकारी हेमंत उशीर, विस्तार अधिकारी अनिल पुदाट यांच्या मार्गदर्शनाने व प्रशिक्षण समन्वयक रमेश बागुल यांच्या नियोजनात मुल्यवर्धीत प्रशिक्षणाचा दुसरा टप्पा सुरु करण्यात आला असून यामध्ये २५० शिक्षकांचा सहभाग असून त्यांना प्रशिक्षण देण्यासाठी एकूण २४ सुलबकांची नियूक्त केली आहे इयत्त १ ली ते ८ वी पर्यंतच्या सर्व माध्यमातील शिक्षकांसाठी सुरु असलेल्या प्रशिक्षणास मार्गदर्शन करतांना प्रशिक्षण समन्वयक रमेश बागुल म्हणाले की, आज मुल्यांची विद्यार्थांमध्ये कमतरता जानवत आहे त्याची अनेक कारणे आहेत विभक्त कुटुंब पध्दतीमुळे पालकांच्या कामाचा व्याप वाढला त्यामुळे मुलांकडे लक्ष द्यायला वेळ मिळेना परिणामी मुलांचे बिघडलेले वर्तन होय त्यामुळे शिक्षकांवर मोठी जबाबदारी आली आहे अनेक ठिकाणी बाल संस्कार केंद्र सुरु आहेत. परंतु पाहिजे तसा प्रतिसादही नाही त्यामुळे विद्यार्थांमध्ये मुल्यांची जाणीव निर्माण व्हावी यासाठी शिक्षकांची भूमिका महत्वाची आहे. त्यांना अनुभवातुन शिक्षण घेण्याचे शिकवा.

# ज्ञानसंपदा शाळा आयोजित आंतरशालेय कथाकथन स्पर्धेस उत्स्फूर्त सहभाग



**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

विद्यार्थ्यांमध्ये वक्तृत्व कौशल्य विकसित व्हावे तसेच त्यांना हक्काचे व्यासपीठ मिळावे तसेच ते वक्तृत्वकलेत पारंगत व्हावेत या उद्देशाने दरवर्षीप्रमाणे यावर्षीही ज्ञानसंपदा शाळा आयोजित आंतरशालेय कथाकथन स्पर्धेमध्ये मराठी, हिंदी व इंग्रजी या विषयांमध्ये स्पर्धक विद्यार्थ्यांनी विविध कथेचे सादरीकरण करत उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

प्रत्येक विषयनिहाय दोन गटात स्पर्धा आयोजित केली होती (५ वी ते ७ वी) ( ८ वी ते १० वी ) सेंट विवेकानंद हायस्कूल, समर्थ स्कुल,रेणुका इंग्लिश स्कूल, ऑक्सिलियम कॉन्व्हेंट स्कूल, अशोक भाऊ फिरोदिया इंग्लिश मीडियम, रेणावीकर विद्यालय, सखाराम मेहत्रे तथा गाडीलकर विद्यालय व स्नेहालय स्कुल, श्री साई स्कुल, या शाळेच्या स्पर्धकांचा उस्फूर्त सहभाग होता.स्पर्धेसाठी श्रीरामपूर मधून मॉडल इंग्लिश स्कूल शाळेने सुद्धा सलग तिसऱ्या वर्षी स्पर्धेमध्ये सहभाग नोंदवला. उत्कृष्ट सादरीकरण करणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रथम द्वितीय तृतीय व उत्तेजनार्थ बक्षीसाबरोबर गौरवचिन्ह व प्रशस्तीपत्रक देण्यात आले. या स्पर्धेचे परीक्षण परीक्षक प्रा. प्रसाद बेडेकर, संजय लोळगे, आर जे प्रसन्न, व्यंकटेश होळेहुन्नूर, सौ. स्वाती रानडे, सौ. आश्लेषा भांडारकर यांनी केले. सौ. आश्लेषा भांडारकर यांनी उत्कृष्ट कथाकथन कसे सादर करावे, त्यामध्ये अभिनय, आत्मविश्वास, वेळ, कथेचा, आशय, बोध याविषयी सखोल माहिती सांगितली, तसेच कथेचे सादरीकरण करावे, याविषयी अत्यंत मौलिक असे मार्गदर्शन केले. त्यामध्ये मुलांनी आपल्या वयोगटा नुसार विषय निवडावा तसेच कथा परिणामकारक असावी असे मार्गदर्शन केले.

# आदित्य सुपेकर याच्या विरोधात कारवाई करण्याची मागणी

**पारनेर : (समर्थ गांवकरी)**

आदित्य राजेंद्र सुपेकर याने गाडीची काच फोडून जवळपास १ लाख ९६ हजार रुपये लंपास केले असल्याची फिर्याद ठेकेदार मोहन बबन पवार यांनी पारनेर पोलिस स्टेशनमध्ये दिली असून आरोपीला तत्काळ अटक करुन त्याच्या विरोधात कारवाई करण्याची मागणी पवार यांनी पारनेर पोलिस निरीक्षक खेडकर यांच्याकडे केली आहे. याबाबत पवार यांनी फिर्यादीत म्हटले आहे की आदित्य सुपेकर याने गेली सहा महिन्यांपूर्वी गाडीची काच फोडली होती. अशाप्रकारे सातत्याने तो आमची खोड काढीत असून याबाबत पारनेर पोलिस स्टेशनमध्ये फिर्याद दाखल करण्यात आली आहे. गेली चार दिवसांपूर्वी मी बँकेतून १ लाख ९६ हजार रुपये रक्कम काढली होती. माझे विज वितरण कंपनीत ठेकेदारीचे काम करीत असल्याने या कामांचे कामगारांचे पैसे देण्यासाठी मला सातत्याने पैशाची गरज लागत असते.

## चौकशीची जाहीर नोटीस

जावक क्रमाका ३८१२/२० २५ दि.२१/११/२०२५
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,अहमदनगर
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अहमदनगर विभाग.. माणिकलाल लोढा बिलडींग, स्वस्तिक चौक, स्टेशन रोड,, अहमदनगर.

एस.आर.एन. क्रमांकः –AHM/०२७३२/१८/२५
फेरफार अहवाल/अर्ज क्रमांकः
सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक श्री संत सेना महाराज मंदिर ट्रस्ट अकोले ता. अकोले जि.अहिल्यानगर बाबत
न्यासाचा पत्ता – अकोले, अकोले, अहिल्यानगर, अहमदनगर, अकोला, अकोला
अर्जदार – आत्माराम केरु शिंदे,
सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त, अहमदनगर, हे वर नमूद केलेला अर्ज यासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्द्यांवर चौकशी करणार आहेत – (१) वर नमूद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरूपाचा आहे काय?
(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय?

**जंगम मिळकत (वर्णन)**

| अ.क्र. | तपशील | अंदाजे मुल्य |
|---|---|---|
| १ | Cash Amount | १४००.०० |

अ) जंगम मिळकत – रोख रु. १४००/– मात्र (अक्षरी रुपये एक हजार चारशे मात्र फक्त)

**स्थावर मिळकत (वर्णन)**

| अ. क्र. | शहर किंवा गांव | सी.एस किंवा महानगर पालिका किंवा सर्वेक्षण क्रं | क्षेत्र | मुल्यांकन | मुदत / कालावधी किंवा स्वरुप | अंदाजे मुल्य |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | Akole Tal. Akole Dist. Ahilyanagar | ११५५ | १०.० * १०.३ | ० | Sena Maharaj Mandir | 500 000 |

स्थावर मिळकत – रोख रु. ५०००००/– मात्र (अक्षरी रुपये पाच लाख मात्र फक्त)
सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिदध झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतींचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.
ही नोटीस माझे सहीनिशी व या कार्यालयाचे शिक्यानिशी आज दिनांक ३१–१०–२०२५ रोजी दिली.

**अधिक्षक**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय अहमदनगर**

# अहमदनगर जिल्हा सहकारी बँकेच्या चेअरमनपदी चंद्रशेखर घुले पाटील यांची निवड!



**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या चेअरमनपदी माजी आमदार चंद्रशेखर घुले पाटील यांची बिनविरोध निवड झाली. बँकेच्या संचालक मंडळ चेअरमन निवड सभा बँकेच्या पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील सभागृहात चेअरमन निवडीचे अध्यक्ष/अध्यासी अधिकारी तथा जिल्हयाचे डीडीआर मंगेश सुरवसे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. चेअरमन पदाच्या नावाची सुचना बँकेचे संचालक अंबादास पिसाळ यांनी मांडली तर अनुमोदन संचालक प्रशांत गायकवाड यांनी दिले. चंद्रशेखर घुले पाटील यांचा एकमेव अर्ज असल्याने त्यांची रितसर निवड झाल्याची घोषणा सभेचे अध्यक्ष मंगेश सुरवसे यांनी केली.

यानंतर नुतन चेअरमन यांचा सत्कार जिल्हयाचे पालकमंत्री तथा जलसंपदा मंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांनी केला. बँकेच्या संचालक मंडळाच्या वतीने बँकेचे व्हाईस चेअरमन ॲड. माधवराव कानवडे यांनी घुले पाटलांचा सत्कार व स्वागत केले. यावेळी बोलताना नामदार विखे पाटील म्हणाले श्रेष्ठींच्या सल्याने व सहकार्याने बँकेच्या चेअरमनपदी घुले पाटील यांची निवड झाली असून बँकेस मोठी परंपरा आहे. बँक नेहमीच शेतकरी व सहकारी साखर कारखान्यांचे प्रश्न सोडवण्यात अग्रेसर असते. नुतन चेअरमन चंद्रशेखर घुले पाटील यांना मोठा अनुभव असल्याने त्याचा बँकेस फायदा होईल असे नामदार विखे पाटील म्हणाले.

याप्रसंगी बँकेचे नवनिर्वाचित चेअरमन चंद्रशेखर घुले पाटील म्हणाले, बँकेच्या संचालक मंडळाने माझ्यावर विश्वास ठेवून माझी चेअरमनपदी निवड केली आहे. मी सर्व संचालकांचे आभार मानतो. बँकेस मोठा वारसा असून यास पात्र राहूनच बँकेचा कारभार करु. याप्रसंगी त्यांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री, देवेंद्र फडणवीस, उप मुख्यमंत्री अजित पवार, पालकमंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील, माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांचेही विशेष आभार मानले.

जिल्हयाचे पालकमंत्री नामदार विखे पाटील यांचा सत्कार बँकेच्या वतीने नवनिर्वाचित चेअरमन माजी आमदार चंद्रशेखर घुले पाटील यांनी केला तसेच चेअरमन निवड सभेचे अध्यक्ष डीडीआर मंगेश सुरवसे यांचा सत्कारही घुले पाटील यांनी यावेळी केला. याप्रसंगी बँकेचे व्हाईस चेअरमन ॲड. माधवराव कानवडे, माजी मंत्री आमदार शंकरराव गडाख, आमदार मोनिकाताई राजळे, आमदार अशुतोष काळे, माजी मंत्री आण्णासाहेब म्हस्के, माजी आमदार भानुदास मुरकुटे, माजी आमदार राहुल जगताप, माजी चेअरमन सिताराम गायकर, संचालक सर्वश्री अरुण तनपूरे, अंबादास पिसाळ, प्रशांत गायकवाड, गणपतराव सांगळे, अमोल राळेभात, अमित भांगरे, करण ससाणे, संचालिका सौ. अनुराधा नागवडे, सौ. आशाताई तापकीर, शेवगांवचे सभापती क्षितीज भैया घुले, अरुण पाटील लांडे, साहेर पटेल, पंडित भन्हाट, संजुभाऊ कोळगे, पंडितकाका भोसले, काकासाहेब नरवडे, हनुमान पातकळ सह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते. याप्रसंगी बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रावसाहेब वर्पे यांनी निवडणूक अधिकारी व संचालकांसह इतर सर्वांचे आभार मानले.

# पोलीस निरीक्षक व तहसीलदार यांना निवेदन

**पारनेर : (समर्थ गांवकरी)**

पारनेर तालुक्यातील सर्व बहुजन समविचारी कार्यकर्त्यांच्या वतीने मालेगाव तालुक्यातील चिमुकलीवरील अत्याचार करणाऱ्या आरोपीला फाशी शिक्षा मिळावी यासाठी पोलीस स्टेशन व तहसील कार्यालय येथे निवेदन. यावेळी खादी ग्रामोद्योग चे संचालक अमित जाधव ,भीम आर्मी तालुकाध्यक्ष संजय भाऊ सोनवणे ,माजी उपसरपंच सुनील शिंदे, आरपीआय तालुका अध्यक्ष आंबेडकर गट किरण सोनवणे ,भारतीय बौद्ध महासभा पारनेर तालुका अध्यक्ष संपत पवार, सामाजिक कार्यकर्ते संदीप राजगुरू, महिला तालुकाध्यक्ष आंबेडकर गट सौ आरती सोनवणे, छत्रपती क्रांती सेना अविनाश देशमुख, सामाजिक कार्यकर्ते गौतम गायकवाड, आदिवासी पारधी महासंघ जिल्हा सरचिटणीस ईश्वर भोसले, सामाजिक कार्यकर्ते अविनाश रोकडे, संविधान व लोकशाही बचाव समिती पारनेर सचिन नगरे, संदीप साळवे, आयुब शेख ,अमोल पवार ,किरण गायकवाड, दीपक साळवे ,बाबुराव इंगळे, नितीन गरुड ,रमेश गायकवाड ,सचिन पवार, भागाराम साळवे ,सिद्धांत पवार ,नितीन सातपुते, समर्थ औटी, विकास सोनवणे, यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते या ठिकाणी उपस्थित होते. मालेगाव तालुक्यातील चिमुकलीवर अमानुषपणे अत्याचार करून तिची अत्यंत निर्घृणपणे हत्या करण्यात आली आरोपीला तात्काळ कठोर शासन करून फाशीची शिक्षा देण्यात यावी, अशी जोरदार मागणी पारनेर तालुक्यातील सर्व बहुजन समविचारी कार्यकर्ते यांच्या वतीने पोलीस निरीक्षक संतोष खेडकर व नायब तहसीलदार कारखिले यांना देण्यात आले आज शिष्टमंडळाने या नृशंस घटनेचा तीव्र निषेध नोंदवत पोलिसांना एक सविस्तर निवेदन सादर केलेआहे. अशा प्रकारच्या अमानुष घटना वारंवार घडत असल्याने समाजात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. अत्याचार तपास जलदगती न्यायालयात चालवावा आणि आरोपीला लवकरात लवकर फाशीची शिक्षा ठोठावली जावी, अशी मागणी आणि हत्येच्या या घटनेने माणुसकीला काळिमा फासला आहे.





खोडद : जुन्नर तालुक्यातील बेल्हा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा नं. 1 मध्ये यशवंतराव चव्हाण कला, क्रीडा व सांस्कृतिक महोत्सव अंतर्गत केंद्र पातळीवरील क्रीडा स्पर्धा खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाल्या.यामध्ये चमचा लिंबू, उंच उडी, लांब उडी, बेडूक उडी, 50 मीटर धावणे, वक्तृत्व, बडबड गिते, वेशभूषा अशा वैयक्तिक स्पर्धांसह खो -खो, लेझीम, कविता गायन, भजन, लंगडी, लोकनृत्य अशा अनेक स्पर्धा संपन्न झाल्या. कार्यक्रमाचे उदघाट्न धावपटू रमेश खरमाळे, उपसरपंच राजेंद्र पिंगट, प्रदीप पिंगट, ग्रामपंचायत सदस्य कमल घोडे, स्वनील भंडारी, जानकु डावखर, मंदाकिनी नायकोडी, कैलास आरोटे, कैलास औटी, सुभाष भुजबळ, केंद्रप्रमुख वनिता हांडे, दादाभाऊ मुलमुले यांनी केले.

## थोडक्यात बातम्या...



### मा. खा. सुजयदादा विखेंच्या वाढदिवसा निमित्त जवळेत रक्तदान शिबिर संपन्न

**पारनेर (स. गांवकरी) :** मा.खासदार सुजय दादा विखे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त जवळेत भाजप पारनेर तालुका, विश्वनाथ दादा कोरडे युवा मंच आणि अष्टविनायक रक्तपेढी अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. रक्तदान शिबिराला भरघोस प्रतिसाद मिळाला. यावेळी 101 रक्तदात्यांनी रक्तदान करून आपल्या सामाजिक जबाबदारीची जाणीव दाखवून दिली. यावेळी भाजप राज्य परिषद सदस्य विश्वनाथ दादा कोरडे, उद्योजक बाळासाहेब सालके पा., राहुल पाटील शिंदे, सागर आबा मैड, दत्तानाना पवार, संदीप सालके पा., सोनालीताई सालके, गणेश सालके, अनिल मदगे, संपत सालके पा., जयदीप सालके पा.,कानिफनाथ पठारे, विशाल पठारे, माउली पठारे, रमेश सालके, माउली वरखडे, अर्जुन नवले, सुशांत ठुबे, भरत ठुबे, रमेश गाडगे, मोहन काळे, दिनेशदादा बाबर, भाऊसाहेब मेचे, अतुल माने, संग्राम पावडे, तुकाराम येवले, नवनाथ सालके, शब्बीर इनामदार, अमोल गायकवाड, कैलास बरशिले, अण्णा सालके, शिवम बढे, तुषार बढे यांसह मोठ्या प्रमाणात जवळा व पंचक्रोशीतील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी रक्तदान करणे ही काळाची गरज आहे आणि रक्तदान करणे हे आपले कर्तव्य असून ते मोठ्या प्रमाणात केले जावे, हे आवाहन विश्वनाथ दादा कोरडे युवा मंच यांच्या वतीने करण्यात आले.

### जुन्नर येथे शेततळ्यात बुडून सख्ख्या बहीण भावाचा मृत्यू

**खोडद (स. गांवकरी) :** जुन्नर येथील जुन्या बसस्थानकासमोरील ईदगाह मैदानाजवळ खेळण्यासाठी गेलेल्या आफान अफसर इनामदार (वय 10) व रिफद अफसर इनामदार (वय 7, दोघे रा. खडकवस्ती, जुन्नर ) या दोन सख्ख्या बहीण भावांचा शेततळ्यात बुडून शनिवार (दि. 22) रोजी रात्री मृत्यू झाला. आफान व रिफद इनामदार यांच्या आईने सांगितले की, ही दोन्हीही मुले शनिवारी खेळण्यासाठी जातो असे सांगून घराच्या बाहेर पडले. त्यावेळी त्यांच्या आईला वाटले की, ही मुले दररोज ज्या ठिकाणी खेळायला जातात त्याचठिकाणी गेली असावीत. मात्र बराच वेळ झाला तरी ही मुले घरी कशी आली नाही म्हणून त्या बघण्यासाठी गेल्या तर त्याठिकाणी ती आफान व रफिद आढळून आले नाही. त्यावेळी त्यांनी शोधाशोध सुरु केली. मात्र, त्यांचा ठावठिकाणा न लागल्याने जुन्नर पोलिसांना याची माहिती दिली. जुन्नर पोलीस व परिसरात बिबट्याचा वावर असल्याने वनविभागाचे पथकही घटनास्थळी दाखल झाले. वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी त्या परिसरात ड्रोनच्या साहाय्याने शोध सुरु केला.त्यावेळी आढळून आले की,एका शेततळ्याच्या काठावर मुलांचे चप्पल, बूट आणि घसरल्याच्या खुणा दिसल्या.त्यावेळी जुन्नर रेस्क्यू टीमच्या सदस्यांनी शेततळ्यात शोध घेतल्यावर मुले पाण्यात बुडाली असल्याचे समोर आले. त्यांनी दोघांचाही मृतदेह पाण्याच्या बाहेर काढून रुग्णवाहीकेद्वारे जुन्नरच्या ग्रामीण रुग्णालयात तपासणीसाठी पाठवण्यात आले. त्यावेळी वैद्यकीय अधिकारी डॉ. जाहिद हसन यांनी सांगितले की, या दोन्ही मुलांचा चार तासांपूर्वी पाण्यात बुडून मृत्यू झाला आहे. पुढील तपास जुन्नरचे पोलीस निरीक्षक किरण अवचर करत आहेत.

### बेल्हा येथे केंद्र पातळीवरील क्रीडा स्पर्धा उत्साहात संपन्न

**खोडद (स. गांवकरी) :** जुन्नर तालुक्यातील बेल्हा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा नं. 1 मध्ये यशवंतराव चव्हाण कला, क्रीडा व सांस्कृतिक महोत्सव अंतर्गत केंद्र पातळीवरील क्रीडा स्पर्धा खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाल्या.यामध्ये चमचा लिंबू, उंच उडी, लांब उडी, बेडूक उडी, 50 मीटर धावणे, वक्तृत्व, बडबड गिते, वेशभूषा अशा वैयक्तिक स्पर्धांसह खो -खो, लेझीम, कविता गायन, भजन, लंगडी, लोकनृत्य अशा अनेक स्पर्धा संपन्न झाल्या. कार्यक्रमाचे उदघाट्न धावपटू रमेश खरमाळे, उपसरपंच राजेंद्र पिंगट, प्रदीप पिंगट, ग्रामपंचायत सदस्य कमल घोडे, स्वनील भंडारी, जानकु डावखर, मंदाकिनी नायकोडी, कैलास आरोटे, कैलास औटी, सुभाष भुजबळ, केंद्रप्रमुख वनिता हांडे, दादाभाऊ मुलमुले यांनी केले स्पर्धेत प्रथम द्वितीय आणि तृतीय क्रमांक मिळालेल्यांना अण्णासाहेब मटाले, सुधाकर सैद आणि अशोक बांगर यांच्या अध्यक्षतेखाली पारितोषिक देण्यात आली. बक्षीस वितरण शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष प्रीतम गुंजाळ, उपाध्यक्ष वैशाली मटाले,, सदस्य ईश्वर पिंगट, स्वाती कोकणे, रेश्मा बनकर, विलास पिंगट, आणि नसरीन पठाण यांनी केले. शाळेतील सर्व स्पर्धांचे नियोजन शाळेचे मुख्याध्यापक सखाराम शेंडकर, उपशिक्षक मीरा बेलकर, रोहिदास साळवे, सुषमा गाडेकर, हरिदास घोडे, प्रविणा नाईकवाडी, अंजना चौरे आणि नूरजहाँ पटेल यांनी केले. सूत्रसंचालन संतोष डुकरे यांनी केले तर आभार अशोक बांगर यांनी मानले.

# टाकळी ढोकेश्वर गावची ग्रामसभा वादळी; प्रकल्पाला गावाचा विरोध

**पारनेर : (समर्थ गांवकरी)**

तालुक्यातील टाकळी ढोकेश्वर ग्रामपंचायत उपसरपंच ,सदस्यांना व ग्रामस्थाना विश्वासात न घेता सत्तेचा गैरवापर करत सौर ऊर्जा प्रकल्पासाठी ५१ एकर जमीन आवादा कंपनीला १ रुपये भाड्याने देण्यात आली आहे त्यामुळे हा सौरऊर्जा प्रकल्प वादाच्या भोवरात सापडला आहे. टाकळी ढोकेश्वर येथे मुख्यमंत्री सौर ऊर्जा प्रकल्प या विषयावरती दुसरांदा विशेष ग्रामसभा गावच्या पारावर पार पडली. टाकळी ढोकेश्वर सरपंच अरुणा खिलारी ह्या ग्रामसभेसाठी उशिरा उपस्थित राहिल्याने आयोजित ग्रामसभेच्या अध्यक्षस्थानी उपसरपंच किरण तराळ यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली.

यावेळी किसन धुमाळ, उपसरपंच किरण तराळ, श्रावण गायकवाड, अंकुश पायमोडे, यांनी या प्रकल्पात मोठी आर्थिक तडजोड झाली असून एक तर चुकीच्या पद्धतीने जागा दिली असल्याचा आरोप ग्रामसभेमध्ये करण्यात आला.

तर या अवादा कंपनीला ५१ एकर जमीन देण्याबाबत लेखी ठराव घेण्यात आला होता त्यावर अनुमोदन म्हणून अमोल आल्हाट यांचे नाव टाकण्यात आले आहे परंतु हा विषय आपल्याला माहित नसल्याचे अमोल आल्हाट यांनी जाहिर ग्रामसभेत सांगत हा ठराव बोगस असल्याचे निदर्शनास आले आहे. या विशेष ग्रामसभेत ग्रामपंचायत पदाधिकारांनी व ग्रामविकास अधिकारांनी बोगस ग्रामसभा व बोगस ठराव करत आवादा कंपनीला गावची गायरान जमीन कंपनीच्या घशात घातली असल्याचा आरोप टाकळी ढोकेश्वर गावातील ग्रामपंचायत पदाधिकारांवर भर ग्रामसभेत करत दोषीवर कारवाई करण्याची मागणी तसेच हे काम त्वरित बंद करावे असं ठराव देखील या ठिकाणी घेण्यात आला.

यावेळी सरपंच अरुणा खिलारी, उपसरपंच किरण तराळ ,माजी सरपंच शिवाजी खिलारी, ग्रामपंचायत सदस्या खिलारी, ग्रामपंचायत सदस्य शुभम गोरडे, दत्तात्रय निवडुंगे, माजी सरपंच सुनिता झावरे, जयसिंग झावरे, बबलू झावरे, बाळासाहेब खिलारी , बापूसाहेब रांधवण, अंकुश पायमोडे, नितीन खोडदे, विक्रम झावरे, विकास आल्हाट, देविदास आल्हाट, संकेत झावरे, अभि जाधव, श्रावण गायकवाड,किसनराव धुमाळ, मळिभाऊ रांधवण, गणेश आल्हाट, पोपट पायमोडे, गणेश चव्हाण, संजय खिलारी, राजेंद्र आल्हाट, प्रकाश गायकवाड, सुबोध गायकवाड, यांच्यासह

ग्रामसेवक दावभट, अंगणवाडी सेविका तसेच वनरक्षक अधिकारी, आदिंसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# प्राणीमित्र रेणुका डुंबरे यांना 'वृक्षमित्र' पुरस्कार प्रदान

**खोडद : (समर्थ गांवकरी)**

पं. कल्याणजी गायकवाड संगीत प्रतिष्ठान, आळंदी यांच्या वतीने 17 नोव्हेंबर रोजी सिद्धबेट, केळगाव, आळंदी येथे दीपोत्सव कार्यक्रम आयोजित केला होता. त्यावेळी या कार्यक्रमात ओतूर येथील प्राणीमित्र रेणुका डुंबरे यांना प्रतिष्ठेचा 'वृक्षमित्र' पुरस्कार सुप्रसिद्ध गायिका कार्तिकी गायकवाड आणि गायक कौस्तुभ गायकवाड यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी पुरस्कार स्विकारताना रेणुका डुंबरे म्हणाल्या, "आई -वडील,मित्र -मैत्रिणी,नातेवाईक यांच्या पाठिंब्यामुळे हे कार्य शक्य झाले. त्यांच्या विश्वासामुळेच मला पुढे जाण्याची प्रेरणा मिळते. मी ओतूर व जुन्नर तालुक्यात पर्यावरण संवर्धन, वृक्षसंवर्धन आणि प्राणीसंरक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल मला हा पुरस्कार देण्यात आला आहे. असे यावेळी त्यांनी सांगितले.



# अनिल लंके यांना आरोग्य दूत पुरस्कार

**पारनेर : (समर्थ गांवकरी)**

निघोज येथील सामाजिक कार्यकर्ते अनिल चंद्रकांत लंके यांना ठाणे येथील खासदार डॉ श्रीकांत शिंदे फाऊंडेशनने आरोग्य दूत पुरस्कार देऊन सन्मानित केले आहे. माजी महापौर मिनाक्षी शिंदे, उपमुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधी कक्ष प्रमुख मंगेश चिवटे, कार्याध्यक्ष रामहरी राऊत यांच्या प्रमुख उपस्थितीत व हस्ते ठाणे येथे हा कार्यक्रम संपन्न झाला. अनिल लंके यांनी गेली चार वर्षांपासून मुख्यमंत्री आरोग्य योजनेच्या माध्यमातून राज्यातील अनेक रुग्णांना आर्थिक मदत मिळवून दिली आहे. याची दखल घेत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मंत्रालयात लंके यांचा गौरव केला आहे.

तसेच ठाणे येथील खासदार डॉ श्रीकांत शिंदे फाऊंडेशन माध्यमातून आरोग्य दूत पुरस्कार देऊन गौरविण्यात आले आहे.

याबद्दल निघोज येथील संदीप पाटील वराळ जनसेवा फौंडेशन, निघोज ग्रुप ग्रामपंचायत व राळेगण थेरपाळचे लोकनियुक्त सरपंच पंकजदादा कारखिले व संदीप पाटील वराळ जनसेवा फौंडेशनचे तालुकाध्यक्ष सचिन पाटील वराळ यांनी त्यांचा सत्कार केला आहे.

यावेळी उपसरपंच ज्ञानेश्वर उर्फ माऊलीशेठ वरखडे, राजमुद्रा कंट्रक्शन कंपनीचे संचालक बाबाजी लंके, बाळा कार्ले, संदीप पाटील वराळ जनसेवा फौंडेशनचे पदाधिकारी राहुल वराळ, अक्षय वरखडे, वडनेरचे माजी सरपंच शिवा पवार, संदीप पाटील वराळ जनसेवा फौंडेशनचे व्यवस्थापक श्रीकांत पवार, सहाय्यक कामगार तलाठी सुनिल उचाळे आदी उपस्थित होते.



सर्वसामान्य जनतेला आरोग्याच्या माध्यमातून मुख्यमंत्री सहाय्यता कक्ष यातून निधी मिळवून देण्याचे काम हे खऱ्या अर्थाने पुण्यकर्म असून गेली चार वर्षे हे काम आपण करीत असून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व खासदार डॉ श्रीकांत शिंदे यांनी मोठ्या प्रमाणात सहकार्य केले असून आजपर्यंत हजारो कुटुंबांना याचा लाभ मिळाला हे मी माझे भाग्य समजतो अशी प्रतिक्रिया आरोग्य दूत पुरस्कार विजेते अनिल चंद्रकांत लंके यांनी व्यक्त केली आहे.

# कलाकारांची आकाशवाणी एफएमवर यशस्वी मोहोर!

**पारनेर : (समर्थ गांवकरी)**

पारनेर तालुक्याच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवत, कान्हुरपठार( गणपती पठार) जिल्हा परिषद शाळेतील चिमुकल्या विद्यार्थ्यांनी थेट अहिल्यानगर आकाशवाणी एफएम केंद्रावर आपल्या सुप्त कलागुणांचे प्रभावी सादरीकरण करत तालुक्याची मान उंचावली आहे. ग्रामीण भागातील या शाळकरी विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल सर्वत्र कौतुक होत आहे. गणपती पठार शाळेतील इयत्ता तिसरी आणि चौथीच्या विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमात सहभाग घेतला. यामध्ये भक्ती मते, श्रद्धा उमाप, श्लोक शेळके, स्वराज मते, सुयश मते आणि दुर्वा ठुबे या सहा विद्यार्थ्यां आपल्या अभिनयाच्या आणि गायनाच्या जोरावर श्रोत्यांची मने जिंकनार आहेत. उत्कृष्ट इंग्रजी नाटिका विद्यार्थ्यांनी सफाईदारपणे सादर केलेल्या इंग्रजी नाटिकेद्वारे त्यांची भाषेवरची पकड आणि आत्मविश्वास दिसून आला.'धरतीची आम्ही लेकरं' 'रानवेडी' गवळण 'रडू नको बाळा मी पाण्याला जाते' या पारंपरिक गवळणीचे भावपूर्ण सादरीकरण. व या सर्व कलाकृतींनी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या बहुआयामी प्रतिभेची ओळख संपूर्ण आकाशवाणीच्या श्रोत्यांना करून दिली.या यशामागे शाळेचे मुख्याध्यापक अजय पवार आणि शिक्षक बाळासाहेब ठाणगे यांचे महत्त्वपूर्ण मार्गदर्शन लाभले. विद्यार्थ्यांमधील कलागुणांना वाव देऊन, कठोर परिश्रमातून आणि योग्य सरावातून त्यांनी हे सादरीकरण आकाशवाणीसारख्या मोठ्या व्यासपीठावर नेण्यासाठी मोलाचे सहकार्य केले. विद्यार्थ्यांची तयारी, उच्चार, आत्मविश्वास आणि वेळेचं भान या सर्व गोष्टींवर शिक्षकांनी विशेष लक्ष दिले, ज्यामुळे सादरीकरण यशस्वी झाले. शाळेतील या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास वाढीस लागून त्यांना मोठे व्यासपीठ मिळाले.




# वडगाव आनंद जिल्हा परिषद शाळेला संगणक देण्याचे आश्वासन

**वडगाव आनंद : (समर्थ गांवकरी)**

जुन्नर तालुक्यातील मौजे शिंदे गावचे सुपुत्र तसेच मुंबई नगरीत व्यापाराच्या निमित्ताने आपले स्थान निर्माण करणारे नवे नवे तर खाद्य पदार्थांमध्ये संपूर्ण महाराष्ट्रभर त्यांच्या व्यवसायाची ख्याती प्रसिद्ध आहेत, असे उद्योजक बाळासाहेब खिलारी यांनी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वडगाव आनंद शाळेला भेट दिली. भेटीदरम्यान पाहुण्यांनी मुलांना मोठ्या प्रमाणात खाऊचे वाटप केले तसेच सर्व शिक्षकांना देखील खाऊचे वाटप केले. आपल्या भाषणात बोलताना मुलांना मेहनत करा, चांगला अभ्यास करा आणि पुढे जाऊन उद्योजक बना, तर कोणी अधिकारी पणा असे सुंदर असे मार्गदर्शन केले. त्याचप्रमाणे खिलारी साहेब हे डिसेंट फाउंडेशन जुन्नर या सेवाभावी संस्थेचे संचालक असल्या कारणाने आणि संस्थेचे तालुकावर प्रचंड मोठ्या प्रमाणात काम असल्याने शाळेतील मुलांसाठी देखील संगणक देण्याचे काम करण्याबाबत त्यांनी आज सुतवाच केले असून लवकरच डिसेंट फाउंडेशन जुन्नर या संस्थेच्या माध्यमातून मुलांना मोठ्या प्रमाणात संगणक देखील मिळणार आहेत.

# नाणेघाट' शिलालेखाला पर्यटकांकडून हानी करण्याचा प्रयत्न

**जुन्नर तालुका : (समर्थ गांवकरी)**

घाटघर ता:-जुन्नर येथील प्राचीन सातवाहन काळातील ऐतिहासिक नाणेघाटातील लेण्यात असणा ऱ्या एकमेव शिलालेखाकडे पुरातत्त्व विभागाचे दुर्लक्ष होत असल्याचे निदर्शनास येत आहे.हा या व्यापारी मार्गाचा साक्षीदार शिलालेख काळाच्या ओघात शेवट ची घटका मोजत असताना निदर्शनास आले आहे या शिलालेखाला येथे येणाऱ्या पर्यटकांमुळे हानी पोहचत आहे.घाटघर येथील लेणीमध्ये बुधवार दि:-१९नोव्हेंबर रोजी मुंबईवरून आलेले पर्यटक हे टेंटमध्ये वास्तव्यास होते पुरातत्त्व विभागाच्या कर्मचाऱ्याला बुधवार सुट्टी असल्यामुळे येथील भग्न व तुटलेल्या दरवाजातून प्रवेश करीत पर्यटक या लेणीत थांबले होते.

या हावशे,गवशे पर्यटकांनी लेणीत शिलालेखाच्या खाली दगडांची चूल तयार केली होती त्यावर जेवण शिजवलेले दिसून आले परिणामी यामुळे झालेल्या धुराने शिलालेख खराब होण्याची शक्यता जास्त असते,यापूर्वीही अनेकदा हे चित्र पाहायला मिळाले आहे दक्षिण भारतातील सवाहनांचा सर्वांत मोठा पुरावा असलेल्या या शिलालेखाकडे दुर्लक्ष केल्यास येत्या काही वर्षांत संपूर्ण शिलालेख नष्ट होऊ शकतो नाणेघाट शिलालेख हे सातवाहन काळातले असून ते ब्राह्मी लिपीत कोरलेले आहेत.या शिलालेखात राणी नागनिकेने केलेल्या विविध यज्ञांचा व ब्राह्मणां ना दिलेल्या दानाचा उल्लेख आहे.हे शिलालेख पुणे जिल्ह्यातील जुन्नर आणि कोकणाला जोडणाऱ्या प्राचीन व्यापारी मार्गावरील गुहेत असून या लेखाची भाषा प्राकृत असून याची लेखक राजमाता नागनिका, जी सातवाहन राजा सातकर्णीची पत्नी होती इतर शिला लेखांमध्ये सातवाहन राजवंशातील सात व्यक्तींच्या प्रतिमा कोरलेल्या आहेत.

संवर्धनाच्या योग्य उपाययोजना न केल्यास आपणच याचे गुन्हेगार असू या शिलालेखात प्राचीन महाराष्ट्राच्या इतिहासाच्या दृष्टीने सर्वात महत्वाचा पुरवा मानले जाते. कल्याण ते पैठण या प्राचीन व्यापारी मार्गावरील लेणीत तो कोरण्यात आला आहे. सातवाहन सम्राज्ञी राणी नागनिकेच्या काळात तो कोरण्यात आला असून,या शिलालेखामुळे सातवाहन राजे तसेच प्राचीन महाराष्ट्रातील धार्मिक,राजकीय, सामाजिक जीवनाविषयीच्या माहितीचा आपणास इतिहास समजू शकतो. घाटघर जवळ नाणेघाट लेणीतील समोरील भिंतीवर सातवाहन घराण्यातील व्यक्तींचे पुतळे कोरले होते ते काळाच्या ओघात नष्ट झाले आहेत मात्र या पुतळ्यांवर त्यांची नावे। देखील कोराल्याने ते व्यक्ती कोण होते याची माहिती समजते याठिकाणी असणारा पहिला पुतळा हा सातवाहन घराण्याचा मूळ पुरष असलेला राजा सीमुकाचा असून,तेथे "राजा सिमुक सातवाहनो सिरीमातो" अशी अक्षरे कोरण्यात आली आहेत.त्यानंतर देवी नायनिक, सिरी सातकनी,कुमार भाय, महारठी तनकवीर,कुमारी हाकुसीरी व कुमारो सातवहानो यामध्ये पाचवा पुतळा असून त्यांचे नाव पूर्णतः अस्पष्ट व धूसर झाले आहे एकूण सात पुतळे येथे कोरले होते.



हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर - ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर - ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, अॅड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे - ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

# टोल नाक्यावर अपघातात एकाचा बळी; आरोपीला अटक नाही

**तामसा : (समर्थ गांवकरी)**

अर्धापूर ते तामसा राष्ट्रीय महामार्गावर तामसा नजीक नियोजित टोल नाक्यावर रुद्राणी कन्स्ट्रक्शनच्या हलगर्जीपणामुळे पर्यायी रस्ता न काढता रस्त्यावर टाकण्यात आलेले 'क्रॅश बॅरियर'ला टक्करून मोटरसायकलचा अपघात झाला. त्यात मोटारसायकल चालकाचा जागीच मृत्यू झाला असून रुद्राणी कन्स्ट्रक्शन व प्रोजेक्ट मॅनेजरवर मृत्यूस कारणीभूत ठरल्याप्रकरणी गुन्हा दाखल झाल्याची घटना दि. २१ नोव्हेंबर रोजी शुक्रवारी मध्यरात्री एक वाजतानंतर घडली.

■ रुद्राणी कन्स्ट्रक्शनवर, सिनियर प्रोजेक्ट मॅनेजर वर गुन्हा दाखल; तामसा येथील घटना

अर्धापूर ते तामसा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ७५२ (आय) महामार्गावर तामसा नजीक टोलनाका उभारण्याचे काम एक वर्षापासून कासवगतीने सुरु आहे. टोलनाका उभारण्याचे काम सुरु असताना रुद्राणी कन्स्ट्रक्शनकडून कोणत्याही प्रकारचा पर्यायी रस्ता, दिशादर्शक चिन्ह, काम चालू असल्याचे दिशादर्शक बोर्ड, बॅरिकेट्स, बॅनर, रेडियम लावून वाहनचालकांना धोक्याचा इशारा देणाऱ्या कसल्याच निशाण्या, पाट्या लावलेल्या नाहीत. त्यामुळे रात्रीच्या वेळी वाहनचालकांना रस्त्यावरील वाहतुकीत येणारे अडथळे दिसत नसल्याने अपघात घडले आहेत. दि २१ नोव्हेंबर रोजी रात्री अंदाजे एक वाजताचे सुमारास घडली आहे. तामसा येथील 'आंध्रा' इडली सेंटरचे मालक सतीश सुरेश बारसे (वय ३६) राहणार बारसगाव ता. अर्धापूर हे मोटारसायकल क्रमांक एम. एच. - २० एफ. बी. ८४७७ वरून गुरुवारी रात्री नांदेडहून हॉटेलचे साहित्य खरेदी करून तामस्याकडे येत होते. राष्ट्रीय महामार्गावर तामसा नजीक नियोजित टोलनाक्याचे काम सुरू असल्याने रस्त्यावरच ठेवण्यात आलेले सिमेंटचे प्लेट 'क्रॅश बॅरियर' ठेवलेले त्यांना दिसले नसल्याने त्यावर मोटारसायकल धडकल्याने मोठा अपघात झाला. त्यातच चालक सतीश बारसे यांचा जागीच मृत्यू झाला. मयताचा भाऊ माणिक सुरेश बारसे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून तामसा पोलीस ठाण्यात रुद्राणी कन्स्ट्रक्शन कंपनी छत्रपती संभाजीनगर व कंपनीचे सिनिअर प्रोजेक्ट मॅनेजर धोंडीराम जांभळे यांचे विरुध्द मृत्यूस कारणीभूत ठरल्या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक शहादेव खेडकर यांच्या मार्गदर्शनाखाली फौजदार बालाजी नरवटे करीत आहेत.पण आधाप ही आरोपी ला अटक झाली नाही किव्हा अटक केली नाही..

झालेली घटना अतिशय गंभीर असून तामसा पोलिसांनी सूत्र हळीवले नाही का ? @संबंधित राष्ट्रीय महामार्ग प्रधिकारण विभाग कंट्रक्शन कंपनी विरुद्ध काय कारवाई करणार यांचा कडे सर्वांचे लक्ष लागलं आहे.



पारनेर : पारनेर नगरपंचायतच्या उपनगराध्यक्षपदी सुप्रिया सुभाष शिंदे यांची सोमवारी बिनविरोध निवड झाली. अपेक्षेप्रमाणे झालेल्या या निवडीने राष्ट्रवादी काँग्रेसच्या (शरद पवार गट) निष्ठावंत कार्यकर्त्यांच्या त्यागाला योग्य न्याय मिळाल्याची भावना व्यक्त होत आहे. सुप्रिया यांचे पती सुभाष शिंदे हे अनेक वर्षे राष्ट्रवादी काँग्रेसचे काटेकोर निष्ठावंत सदस्य राहिले असून, त्यांच्या निष्ठेची दखल घेत खासदार नीलेश लंके यांनी शिंदे परिवाराला या पदाची संधी देत त्यांचे योगदान अधोरेखित केले.

## थोडक्यात बातम्या...

### भाजप जिल्हा निवडणूक संचालन समितीवर प्रा. मनोहर पवार यांची निवड



**नायगाव (स. गांवकरी) :** नायगाव तालुक्यातील येणाऱ्या जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांसाठी भारतीय जनता पक्षाने जिल्हा पातळीवर सूक्ष्म आणि भक्कम नियोजनाला सुरुवात केली असून यासाठी २० विभागांची जिल्हा निवडणूक संचालन समिती गठीत करण्यात आली आहे. त्यातील महत्त्वपूर्ण सामाजिक संपर्क समितीच्या प्रमुख पदाची धुरा भाजपा अनुसूचित जाती मोर्चाचे जिल्हाध्यक्ष तथा पंचायत समिती नायगावचे माजी सभापती प्रा. प्राचार्य मनोहर पवार यांच्याकडे सोपवण्यात आली आहे. सदर समिती अंतर्गत सर्व जाती-समाजांना एकत्रित बांधून पक्षाची विचारसरणी तळागाळात पोहोचवणे आणि भाजपाचा जनाधार वाढविण्याची जबाबदारी प्रा. पवार यांच्यावर सोपविण्यात आली आहे. मागासवर्गीय घटकांमध्ये असलेला दमदार संपर्क, संघटन कौशल्य, जिद्द व झोकून देऊन काम करण्याची कार्यशैली याचा योग्य परामर्श करून ही अत्यंत महत्त्वाची नियुक्ती पक्षाने त्यांच्यावर विश्वासाने दिली आहे. प्रा. पवार यांच्या निवडीचे वृत्त समजताच सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांत उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून अभिनंदनाचा वर्षाव सुरू झाला आहे. या विश्वासाबद्दल कृतज्ञता व्यक्त करताना प्रा. मनोहर पवार म्हणाले—"पक्षाने माझ्यावर दाखविलेला विश्वास मी सार्थ ठरवेल. दिलेल्या जबाबदारीचे रूपांतर विजयात करून दाखवणे हाच माझा हेतू असेल."

### जलतारा प्रकल्पाचा बरबडा येथे काम प्रगतीपथावर चालू

**नायगाव (स. गांवकरी) :** नायगाव तालुक्यातील बरबडा येथे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत पंचायत समिती नायगाव येथे राबविण्यात येणाऱ्या "जलतारा" या महत्त्वपूर्ण प्रकल्पाचा शुभारंभ लालवंडी (ता. नायगाव) येथे कृषी उपसंचालक यांच्या उपस्थितीत करण्यात आला. शेती व शेतकऱ्यांच्या जलसुरक्षेसाठी शेतात ५×५ फुटांचे खड्डे तयार करून त्याचे पुनर्भरण करण्याद्वारे भूजल पातळी वाढविणे हा या योजनेचा उद्देश आहे. या अंतर्गत प्रत्येक खड्डयासाठी ५ हजार रुपये अनुदान मिळणार असल्याची माहिती कृषी विभागाकडून देण्यात आली. मोहन मैसनवाड यांनी बरबडा येथील शेतकऱ्यांना देण्यात आली तेचे काम प्रगतीपथावर चालू आहे येथील शेतकऱ्यांनी २६ जानेवारीपर्यंत १ हजार खड्डयांची पूर्तता करण्याची हमी देत या योजनेला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. शेतकऱ्यांनी या योजनेचा अधिकाधिक लाभ घ्यावा, असे आवाहनही अधिकाऱ्यांनी केले. कार्यक्रमास कृषी उपसंचालक वानखेडे, गटविकास अधिकारी ढवळे, तालुका कृषी अधिकारी देवरे, सहाय्यक कृषी अधिकारी मोहन म्हैसनवाड, यांनी बरबडा येथील शेतकऱ्यांना या कार्य सहभाग घेण्यात यावे असे आवाहनही केले आहे

### सहयोगच्या फार्मसी कॉलेज मध्ये इंडक्शन कार्यक्रम व पालक भेट संपन्न

**नांदेड (स. गांवकरी) :** सहयोग सेवाभावी संस्थेच्या इंदिरा कॉलेज ऑफ फार्मसी आणि कॉलेज ऑफ फार्मसी, विष्णुपुरी, नांदेड येथे दिनांक २२ नोव्हेंबर २०२५ रोजी नव्याने प्रवेश घेतलेल्या बी. फार्मसी, एम. फार्मसी, फार्म.डी आणि डी. फार्मसी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांसाठी इंडक्शन कार्यक्रम व पालक भेट आयोजित करण्यात आली. हा कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात यशस्वीरीत्या पार पडला. कार्यक्रमाचे उद्घाटन दीपक कोठारी, सदस्य, महाराष्ट्र राज्य फार्मसी परिषद (MSPC), नरेश डोके, मुख्य औषधनिर्माण अधिकारी, डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नांदेड, राजेश्वर रेड्डी, समन्वयक, महाराष्ट्र राज्य फार्मसी परिषद, . शेख सिकंदर, अधीक्षक, परीक्षा विभाग, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड या प्रमुख अतिथींच्या हस्ते करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव डॉ. संतुकरावजी हंबर्डे उपस्थित होते. अतिथींच्या मार्गदर्शनात फार्मसी शिक्षणाचे महत्त्व, व्यवसाय संधी, संशोधन व उद्योग क्षेत्रातील वाढत्या मागण्या तसेच शासकीय नोकरीच्या संधींचा आढावा विद्यार्थ्यांना देण्यात आला. शासकीय सेवेत संधी सांगताना डोके सरांनी, तर फार्मसी उद्योगक्षेत्र आणि व्यवसाय संधींवर कोठारी सरांनी विशेष प्रकाश टाकला. रेड्डी सरांनी खाजगी क्षेत्रातील विस्तृत करिअर पर्यायांची माहिती दिली तर शेख सिकंदर सरांनी विद्यापीठ परीक्षा पद्धती व शैक्षणिक संरचनेबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

### डॉ. आनंदीबाई जोशी प्रसूतिगृहाचे सुसज्ज रुग्णालयात रूपांतर - प्रताप सरनाईक



**ठाणे (स. गांवकरी) :** परिवहन मंत्री तथा स्थानिक आमदार प्रताप सरनाईक यांच्या निधीतून डॉ. आनंदीबाई जोशी प्रसूतिगृहाचे अत्याधुनिक रुग्णालयात रूपांतर करण्याच्या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाचा भूमिपूजन सोहळा आज संपन्न झाला. ब्राह्मण विद्यालय समोर, वर्तकनगर येथे हा सोहळा पार पडला. सदर नव्या रुग्णालयात १०० खाटांची आधुनिक सुविधा उपलब्ध होणार असून परिसरातील नागरिकांसाठी हा प्रकल्प एक मोठा दिलासा ठरणार आहे. अत्याधुनिक वैद्यकीय तंत्रज्ञान, उन्नत उपचार व्यवस्था आणि रुग्णसेवेसाठी आवश्यक सोयीसुविधांनी परिपूर्ण अशी रचना या रुग्णालयाची असणार आहे असे प्रतिपादन मंत्री सरनाईक यांनी यावेळी केले. या सोहळ्याला माजी महापौर हरिश्चंद्र पाटील, ठाणे महापालिका उपाआयुक्त उमेश बिरारी, वैद्यकीय अधीक्षक प्रसाद पाटील, राजेंद्र फाटक, राधिका फाटक, विमल भुईर, कल्पना पाटील, भगवान देवकाते आदी शिवसेनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नांदेड जिल्हा परिषद सदस्य पदाचे आरक्षित ३ गटावर टांगती तलवार?

■ ५०%समतोल करण्यासाठी ३३ गट आरक्षण आवश्यक सद्यापारिस्थिती ३६ गट केल्या आरक्षित. सर्वोच्च न्यायालया च्या अंतिम निर्णया कडे सर्वांचे लक्ष.




**तामसा : (समर्थ गांवकरी)**

नांदेड जिल्हा परिषद आरक्षणात ५० टक्क्यांची मर्यादा ओलांडल्याने सोडत पुन्हा होणार ? किव्हा राजकीय मर्यादित आरक्षण कमी करून समतोल करण्यात येईल.नांदेड जिल्हा परिषद च्या एकूण ६५ जागेवर सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार राखीव जागांचे आरक्षण ५० टक्क्यांच्या मर्यादित पाहिजे. मात्र, सर्वाधिक लोकसंख्येच्या आधारे उतरत्या क्रमात आरक्षण सोडतीमुळे जिल्ह्यात मर्यादेचे सीमोल्लंघन होऊन ३६ जागा आरक्षित झाल्याने "खेळा होईग्या" आरक्षित जागांचे प्रमाण ५६टक्क्यावर गेल्याने काही आरक्षित जागा बदलण्याची शक्यता असून याचा कोणाला फटका बसणार हे दिनांक २५ रोजी सर्वोच्च न्यायालयात होणाऱ्या सुनावणीनंतर समजणार आहे. @ चोकट@राजकीय मर्यादित आरक्षण जातीनिहाय क्रमश. अनुसूचित जाती १३%, अनुसूचित जमाती ७%, नागरिकांचा मागास प्रवर्ग २७%या मर्यादित आरक्षणच्या आधारे ६५ पैकी ३३ गट आरक्षण ५०% पण सदपारिस्थितीत आरक्षण सोडतीत नागरिकांचा मागास प्रवर्ग वर गदा बसल्याने समजते. अनुसूचित जाती च्या १३ टक्के चा आरक्षण च्या आधारे ८ गट आरक्षण गणित बनते पण या सोडतीत १३ गट सुटल्यानं तसेच अनुसूचित जमाती (एस टी) ७टक्के चा आरक्षण च्या आधारे ५ गट आरक्षित होते पण या समीकरणात लोकसंख्या च्या आधारे झालेल्या आरक्षण सोडतीत हा राजकीय गणित अभ्यासपूर्ण न केल्यानं ओबीसी वर गदा बसल्याने कळते या नागरिकांचा मागास प्रवर्ग ला राजकीय आरक्षण श्रेणीत २७टक्के दिलेलं आहे पण या सोडतीत १८ गट अपेक्षित असताना १७ गट सोडतीत मिळालं या १ गट कमी मिळाल्याने हा राजकीय समीकरण सर्वोच्च न्यायालय पर्यंत गेला... @ राजकीय पुढाऱ्यांचे भवितव्य स्थानिक स्वराज्य संस्थानच्या निवडणुकीत ५० टक्के मर्यादित आरक्षण असावे, याबाबत न्यायालयाने शासनाला निर्देशित केले आहे. जिल्ह्यात गटांची आरक्षण स्थिती पाहता टक्का ५० वरून ५६ वर पोहोचला आहे.. अशात मागील महिन्यात जिल्हा परिषद निवडणुकांसाठी आरक्षण सोडत झाली. त्यानंतर तळागळातील कार्यकर्ते मोठ्या जोमाने निवडणुकीच्या तयारीला लागले होते. मात्र, जिल्हा परिषदांमध्ये आरक्षणाची ५० टक्क्यांची मर्यादा ओलांडल्याचे निदर्शनास आले. यामध्ये नांदेडचाही समावेश असल्याने निवडणूका आणखी लांबणार काय? असा प्रश्न पडला आहे.नांदेड जिल्हा परिषदे अंतर्गत येणाऱ्या ६५ जि. प. गटांपैकी ३६ गट आरक्षित झालेत. यामध्ये नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग (ओबीसी) १७, अनुसूचित जाती (एससी) १३, अनुसूचित जमाती (एसटी) ६ जागांचा समावेश असून २९ जागा ह्या सर्वसाधारण प्रवर्गासाठी (ओपन) आरक्षित झाल्या होत्या. मात्र, यात ५० टक्केची आरक्षण मर्यादा ओलांडल्याने पुन्हा आरक्षित गट बदलणार अशी चर्चा होत आहे.राजकीय आरक्षणात तंतोतंत मर्यादितेत समतोल करून कोणत्या दोन अथवा तीन आरक्षित गटावर गदा बसेल या कडे सर्वांचे लक्ष लागले आहे.. समीकरणात नांदेड जिल्ह्यातील अनुसूचित जाती च्या ५गट व अनुसूचित जमाती च्या एक गट जास्त आरक्षित झाल्याने हदगांव हिमायतनगर तालुक्यातील सरसम व तामसा अनुसूचित जमाती ला आरक्षण सुटल्याने या दोन गटापैकी एक गटाचे आरक्षण रद्द होऊन या जागेवर ओबीसी अथवा सर्वसामान्य ला जाऊ शकते तसेच तामसा गट अनुसूचित जमाती लोकसंख्या आधारे पूर्ववतं आरक्षण जेसेथे राहू शकते यात शंका नाही..

## मनपाची सिडको परिसरात, रस्त्यावर विक्री करणाऱ्या विरूद्ध कार्यवाही

**नवीन नांदेड : (समर्थ गांवकरी)**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका यांच्या वतीने सिडको क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत असलेल्या प्रभाग क्रमांक 20 मधील सिडको परिसरातील मुख्य बाजारपेठ मध्ये असलेल्या मुख्य रस्त्यावरील फळे ,भाजीपाला,फुल विक्रेते यांच्या सह विविध प्रतिष्ठानचा वतीने दुकानाबाहेर ठेवण्यात येणारा विक्रीसाठी असलेल्या वस्तू यांच्या वर मनपा अतिक्रमण पथकाने गुरूवार व सोमवार दोन दिवस केलेल्या कार्यवाहीने रस्ता मोकळा झाला असून प्रशासनाने सातत्याने हि कार्यवाही कायम ठेवावी अशी मागणी होत आहे. सिडको क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत प्रभाग क्रमांक 19 व 20 मध्ये गेल्या अनेक दिवसांपासून पासून मुख्य मार्गावर बाजारपेठ व रस्त्यावर विविध प्रतिष्ठानचा वतीने व फळ गाडे, भाजीपाला विक्रेते यांच्या सह अनेकांनी मोठ्या प्रमाणात अतिक्रमण केल्याने जाणारी येणारी वाहतूक दैनंदिन खोळंबत असल्याने व आठवडी बाजार दिवशी मोठ्या प्रमाणात वाहतूक खोळंबली असल्याने या बाबत अनेकांनी व परिसरातील आजी माजी नगरसेवक यांनी तक्रारी केल्या होत्या.

## कंधार/लोह्यात राष्ट्रवादीने नव्या जुन्या उमेदवारांना संधी दिली

**उपमुख्यमंत्री अजित पवार**

**कंधार : (समर्थ गांवकरी)**



कंधार व लोहा शहरात राष्ट्रवादीने नव्या जुन्याचा योग्य समन्वय साधून उमेदवारांना संधी दिले आहेत. पाच वर्षासाठी दोन्ही शहरांची सूत्र कुणाच्या हातात द्यावी, याचा सदविवेक बुध्दीने विचार करण्याची वेळ आली आहे. सर्व समाजातील तरुणांना उच्च शिक्षणासाठी आणि उद्योगासाठी कर्ज उपलब्ध करून देण्यासाठी राज्य सरकार कडून विविध योजना सुरू करण्यात आल्या आहेत. राज्य प्रगतीकडे नेण्याचा आमचा मानस आहे. कुणाच्या भूलथापांना बळी पडू नका. कंधार व लोहा शहराच्या सर्वांगीण विकासासाठी राष्ट्रवादीच्या हातात सत्ता द्या असे आवाहन राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी जाहीर सभेत केले. कंधार व लोहा शहरातील राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी कंधार येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात आयोजित जाहीर सभेत ते बोलत होते. आमदार प्रताप पाटील चिखलीकर, भास्करराव पाटील खतगावकर,ओमप्रकाश पोकर्णा, अविनाश घटे, सुभाष साबणे, मोहन हंबर्डे, ॲड. मुक्तेश्वर धोंडगे, प्रवीण पाटील चिखलीकर, कंधार नगराध्यक्ष उमेदवार स्वप्निल पाटील लुंगारे, लोहा नगराध्यक्ष शरद पवार,सौ.अनुराधा केंद्रे, प्रा. चित्रताई लुंगारे,मन्नान चौधरी, म.जफरोद्दिन, बाबुराव केंद्रे,किशन डफडे यांच्यासह 10 प्रभागातील सर्व उमेदवारांची उपस्थिती होती.

आमदार चिखलीकर यांनी प्रस्ताविक केले. कंधार शहराच्या वैभवात भर कशी करायची यासाठी संधी चालून आलेली आहे. कंधारच्या जनतेला विकास पाहिजे. ज्यांची केंद्रात व राज्यात सत्ता नाही. अशी लोक शहराचा विकास करण्याच्या गप्पा मारत आहेत. नगरपालिका राष्ट्रवादीच्या ताब्यात द्या. अजित पवारांच्या माध्यमातून कंधारचा चेहरा मोहरा बदलल्या शिवाय राहणार नाही. मी कुठ्याही पक्षात असलो तरी जातीयवाद केला नाही असेही त्यांनी स्पष्ट केले. यावेळी मोठ्यासांख्येने मतदादारासहीत लाडक्या बहिणीची लक्षणीय उपस्थिती होती.

## सायकलिंगमुळे मनही तंदुरुस्त राहते - सह पोलीस आयुक्त, ठाणे



**ठाणे : (समर्थ गांवकरी)**

जी गोष्ट पॅशन म्हणून केली जाते तिचे परिणाम उत्तम आरोग्य आणि सकारात्मक ऊर्जा यांमध्ये दिसून येतात. एक व्यक्ती तंदुरुस्त राहिल्याने त्याचा परिणाम अनेकांवर होतो, प्रेरणादायी ठरतो. फिटनेसचा संदेश सर्वसामान्यांपर्यंत पोहोचणे आवश्यक आहे. सायकलिंग हा इको-फ्रेंडली, सर्वांना सहज उपलब्ध आणि प्रभावी व्यायामाचा स्रोत आहे. आपण शरीराने जितके तंदुरुस्त राहू, तितके मनही तंदुरुस्त राहते आणि विचार स्पष्ट व सक्षम होतात असे मत ठाण्याचे सहपोलीस आयुक्त डॉ. ज्ञानेश्वर चव्हाण यांनी व्यक्त केले. आम्ही Cycle प्रेमी फाऊंडेशनतर्फे आजवरच्या १३५९ राईड आणि १,०४,७६२ किमी पेक्षा अधिक प्रवास करणाऱ्या सोलापूरच्या प्रकाश गिरी यांचा सोमवारी ठाणे पोलीस आयुक्तालयात डॉ. चव्हाण यांच्या हस्ते विशेष सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला. ६१ व्या वर्षी गिरी यांनी दाखवलेली शिस्तबद्ध आणि प्रेरणादायी सायकलिंग वाटचाल याचे डॉ. चव्हाण यांनी विशेष कौतुक केले. गिरी हे मागील तीन वर्षांपासून दररोज पहाटे १०० किमीची नियमित सायकलिंग करतात सायकलिंगमुळे ८९ किलोवरून ६३ किलोपर्यंत केलेला अतुलनीय बदल हा फिटनेस जगतातील एक प्रेरणादायी आदर्श आहे. रात्री २.४० वा. झोपेतून उठल्यानंतर पहाटे ३.४० वा. ते सायकलिंगला सुरूवात करतात. डॉ. चव्हाण पुढे म्हणाले की, फिटनेसचे महत्त्व आजच्या काळात झपाट्याने वाढत आहे.


## शिळ-कल्याण रस्त्यावर देसाई खाडीत आढळला तरुणीचा मृतदेह

**ठाणे,दिवा : (समर्थ गांवकरी)**

शिळफाटा - कल्याण रस्त्यावरील देसाई खाडी पुलाखाली नदी पात्राच्या काठाला एका २५ ते ३० वर्षाच्या तरूणीचा सुटकेसमध्ये मृतदेह आढळून आल्याने खळबळ उडाली आहे. सोमवारी दुपारी या पुलावरून जाणाऱ्या काही पादचाऱ्यांना हा मृतदेह निदर्शनास आला. शीळ डायघर पोलिसांना याप्रकरणाची माहिती देण्यात आली. पोलीस तातडीने घटनास्थळी दाखल झाले. या तरूणीला घर किंवा अन्य ठिकाणी मारून तिला सुटकेसमध्ये भरून रात्रीच्या वेळेत देसाई खाडी किनारी आणून टाकले असावे असा प्राथमिक अंदाज पोलिसांनी वर्तवला आहे. देसाई खाडी पात्रात एका तरूणीचा मृतदेह एका सुटकेसमध्ये भरून आणून टाकला असल्याची माहिती मिळाल्यावर या पुलावरून जाणाऱ्या मोटार, दुचाकी आणि इतर वाहन चालकांनी वाहने थांबवून घटनास्थळाची आणि संबंधित कोणी परिचित आहे का यासाठी प्रयत्न केले.

# मुर्ती स्थापना वर्धापन सोहळ्या निमित्ताने अखंड हरिनाम सप्ताह

**नवीन नांदेड: (समर्थ गांवकरी)**






श्री हनुमान मंदिर,संत ज्ञानेश्वरी संजिवनी समाधी सोहळा निमित्ताने अखंड हरिनाम सप्ताह ,ज्ञानेश्वरी पारायण, व श्रीहरी कीर्तन मौजे तुप्पा ता.जि. येथे 17 ते 24 नोव्हेंबर 25 पर्यंत आयोजित करण्यात आला होता, यावेळी भागवत कथाकार हभप विश्वनाथ महाराज कांकाडीकर यांच्या काल्याचा किर्तनाने सप्ताह सांगता करण्यात आली यावेळी पंचक्रोशीतील अनेक गावांतील महिला भाविक भक्त यांच्या सह ग्रामस्थांनी महाप्रसाद लाभ घेतला.

श्री हनुमान मंदिर तुप्पा येथे मुर्ती स्थापने चा 9वा वर्धापनदिन सोहळा निमित्ताने प्रेरणास्थान वै. मामासाहेब मारतळेकर, ह.भ.प.आंनदबन गुरू गंभीरबन मंहत, शिभप सांब शिवाचार्य महाराज,वैदांताचार्य दिगंबर शिवाचार्य महाराज,हभप भाऊसाहेब महाराज, हभप विश्वनाथ महाराज , हभप कै. माणिक महाराज, व प्रेरणास्थान किशन महाराज बरडेकर यांच्या आशिर्वादाने श्री संत ज्ञानेश्वरी संजिवनी समाधी सोहळ्या निमित्य अखंड हरिनाम सप्ताह व श्री हरी कीर्तन मौजे तुप्पा ता. जि. नांदेड येथे दि. 17 ते दि. 24 नोव्हेंबर 25 दरम्यान दैनदिन कार्यक्रम या सोहळ्यात सकाळी 4 ते 6 काकडा भजन, 7ते 10ज्ञानेश्वरी पारायण, 10 ते 12 गाथा भजन, दुपारी 1 ते 3 तुकाराम चरित्र, 3 ते 6भोजन, 6 ते 7 हरिपाठ आयोजित करण्यात आले असून दि. 17 नोव्हेंबर रोजी सोमवार ह. भ. प. श्री किशन महाराज बरबडेकर यांचे संजीवनी सोहळ्या निमित्त्य सकाळी 11ते दु. 1 गुलालाचे किर्तनाने आयोजित करण्यात आले होते, यावेळी काकांडा प्रमुख हभप शिवाजी मुंडकर, बालाजी भिमराव पाटील कदम, भास्कर कदम,तर तुकाराम चरित्र वाचक हभप आनंदराव पाटील इंगळे राहेगावकर व राम पाटील कांकाडीकर यांनी केले होते.

24 नोव्हेंबर हभप विश्वनाथ महाराज कांकाडीकर यांच्या काल्याचे कीर्तनाने व महाप्रसादाने सांगता झाली,अखंड हरिनाम सप्ताह मध्ये गावातील अन्नदाते शिवहार पांडूरंग भालेराव, रामचंद्र महादजी पा. कदम,

गणेश मारोती भालेराव,माधव विठ्ठल पा. कल्याणकर, सुदाम माणिकराव पा. कदम श्रीराम पा. कदम,विठ्ठल मारोती पाटील कदम, रोहिदास कदम,रावसाहेब महाजन कदम ,(मुकदम) , गंगाधर नरवाडे,अशोक कदम, साहेबराव कदम,पंडीत महादजी पा.कदम ,महाजन माणिकाराव कदम, प्रमोद सुरजमल नागोरी,यांनी सहकार्य केले आहे. तर सप्ताह सांगता सोहळ्याला माजी जिल्हा परिषद सदस्य मनोहर पाटील शिंदे, शिवसेना तालुकाप्रमुख उध्दव पाटील शिंदे , बालाजी पाटील भायेगावकर, माजी पंचायत समिती सदस्य गंगाधर नरवाडे, मारोती तळणे, सरपंच सौ.मंदाकिनी यन्नावार, ऊपसरपंच प्रतिनिधी दता पाटील कदम, महाजन पाटील,विलायात कदम,देवराव टिपरसे,गुलाब कदम,श्रीराम पाटील, गजानन कदम, यांच्या सह पोलीस पाटील वसंत पल्लेवाड, व माजी पोलीस पाटील अझमोध्दीन, यांच्या सह गावातील जेष्ठ नागरिक युवक,महिला भाविक भकत मोठया संख्येने उपस्थित होते, कार्यक्रम यशस्वीतेसाठी गावकरी मंडळी, तुप्पा ता. जि.नांदेड यांनी परिश्रम घेतले.

# ड्रॅगनची विद्युतचुंबकीय शक्ती

चीनच्या फुजिआन या विमानवाहू युद्धनौकेवर विमाने उडविण्यासाठी विद्युतचुंबकीय प्रक्षेपक यंत्रणा वापरण्यात आली आहे. चीन जे काही करतो ते भव्यदिव्य, चकित करणारे असते. सध्या चीनमधील अशाच एका घडामोडीने हिंद-प्रशांत क्षेत्रातील आरमारी वातावरण ढवळून निघाले आहे. चीनने याच महिन्यात त्यांच्या नौदलात 'फुजिआन' ही तिसरी विमानवाहू युद्धनौका दाखल केली. तिच्यावरील विद्युत-चुंबकीय शक्तीच्या सामरिक लाटांची कंपने अमेरिकेपासून भारतापर्यंत न पोहोचती, तरच नवल. चिनी नौदलाकडे या शतकाच्या प्रारंभीपर्यंत विमानवाहू युद्धनौका नव्हती. त्यांच्याकडच्या पाणबुड्यांची संख्या ५०च्या घरात असल्याची चर्चा व्हायची. परंतु २०१२च्या सुमारास चिनी नौदलात लायोनिंग ही ५५ हजार टनांची विमानवाहू युद्धनौका सज्ज झाली. सोव्हिएत संघासाठी बांधलेली ही मूळची वरयाग नावाची नौका २१ महिने सागरी प्रवास करत चिनी बंदरात आली. पुढच्या चारच वर्षांत चीनने शँडोंग ही विमानवाहू युद्धनौका स्वबळावर बांधली. विमानवाहू युद्धनौकाबांधणीचा सराव तर चीनने १९८५ पासूनच सुरू केला होता. चीन एक-दोनवर थांबत नसून २०३० पर्यंत तब्बल सहा विमानवाहू युद्धनौका ताफ्यात बाळगण्याचे चीनचे



## संपादकीय

उद्दिष्ट आहे. जगात कुठेही संघर्ष झाला की शंभर-शंभर विमाने उडविणारी आपली विमानवाहू युद्धनौका तैनात करायची, ही अमेरिकेची युद्धनीती होती. त्यास आव्हान देण्यासाठी चीननेही आपल्या विमानवाहू युद्धनौकांचा गुणाकार करण्याचा चंग बांधला. तंत्रज्ञान व हवाई बळातही अमेरिकेच्या तोडीस तोड होण्याचे नियोजन त्यांनी केले. हैनानमधील सान्या बंदरात कमिशनिंग झालेली आजवरची सर्वांत मोठी विमानवाहू युद्धनौका फुजिआन ही याच खेळीतील पुढचा आधुनिक अवतार. अमेरिकेच्या यूएसएस जेराल्ड फोर्ड या अत्याधुनिक विमानवाहू युद्धनौकेवरील तंत्रज्ञानाचाच आविष्कार चिनी फुजिआनवरही साकारला



आहे. विमाने उडविण्यासाठी विद्युतचुंबकीय प्रक्षेपक यंत्रणा (इलेक्ट्रोमॅगनेटिक कॅटापूल्ट) त्यात वापरली आहे. पूर्वीच्या विमानवाहू युद्धनौकांवर पुढच्या बाजूस असलेल्या उंचावलेल्या डेकवरून विमाने झेपावत. त्यामुळे बराच काळ डेक व्यापून राहतो. त्याऐवजी अत्यल्प वेळात म्हणजे अवघ्या तीन सेकंदांत एका विमानाचे उड्डाण करणे व पुढच्या ४५ सेकंदात यंत्रणा पूर्ववत आणून नव्या विमानाच्या उड्डाणासाठी डेक सज्ज करणे, या यंत्रणेत शक्य होते. त्याचप्रमाणे विमानाचे लँडिंग करतानाही दोराच्या साह्याने अटकाव करून विमान थांबविले जाते. ही यंत्रणा आपल्याकडेही सध्या वापरली जाते. परंतु विमान हवेत झेपावताना विद्युत-चुंबकीय उड्डाण-सहायक यंत्रणा वापरल्यामुळे अधिक वजनदार विमाने, कमी ऊर्जेत डेकवरून उडविता येतात. त्यात विमानांच्या सांगाड्यालाही कमी हानी पोहोचते.

## दै. समर्थ गांवकरी सूडोकू क्र. ४५

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 3 | 5 | 4 | | 8 | | | |
| | | 4 | 1 | 5 | 6 | | | 9 |
| | 1 | 6 | | | | 5 | 4 | 2 |
| 1 | | 8 | | | | | | |
| | 5 | | 8 | | 7 | | 6 | |
| | | | | | | 3 | | 5 |
| 6 | 2 | 3 | | | | 9 | 5 | |
| 4 | | | 5 | 1 | 9 | 6 | | |
| | | | 3 | | 2 | 4 | 7 | |

उत्तर उद्याच्या अंकात

**खेळाचे नियम :** प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३-३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

### सूडोकू क्र. ४४ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 9 | 7 | 3 | 5 | 4 | 6 | 2 | 1 | 8 |
| 1 | 8 | 6 | 7 | 2 | 9 | 3 | 5 | 4 |
| 2 | 5 | 4 | 8 | 1 | 3 | 6 | 9 | 7 |
| 4 | 9 | 7 | 2 | 5 | 1 | 8 | 6 | 3 |
| 3 | 6 | 5 | 9 | 7 | 8 | 4 | 2 | 1 |
| 8 | 2 | 1 | 6 | 3 | 4 | 5 | 7 | 9 |
| 7 | 3 | 2 | 4 | 9 | 5 | 1 | 8 | 6 |
| 5 | 4 | 8 | 1 | 6 | 7 | 9 | 3 | 2 |
| 6 | 1 | 9 | 3 | 8 | 2 | 7 | 4 | 5 |

पंचांग
२५ नोव्हेंबर २०२५
मंगळवार
विक्रम संवत्- २०८२
मार्गशीर्ष शके
संवत्- १९४७

संवत्सर - विश्वावसूनाम
अयन- दक्षिणायान
मास- मार्गशीर्ष
ऋतु- हेमंत
शुक्ल पक्ष
तिथि:पंचमी २२:५७:१८

नक्षत्र:उत्तराषाढा
२३:५७:२८
योग:गण्ड १२:४९:१९
करण:बव १०:१३:०८
करण:बालव २२:५७:१८
सूर्य:वृश्चिक

## उपदेशाचे डोस

### आनंदी राहण्याचा निर्णय घ्या

आनंदी राहाणे ही एक चांगली सवय आहे. पण, लोक आनंदी राहाण्यापेक्षा दु:खाची कारणे शोधण्यातच वेळ घालवतात. आनंदी राहण्यामुळे सकारात्मक ऊर्जा प्रवाहित होऊन सुख आणि समृद्धी येते. म्हणून आनंदी राहण्याचा निर्णय घ्या. प्रसन्नतेत सौंदर्य आहे. प्रसन्नता आनंदी राहण्या मुळे येते. त्यामुळे आनंदी राहा. वेळ, शक्ती, उर्जा व योग्यतेचा उपयोग केल्यास आपली प्रगती निश्चित आहे. प्रत्येकाने आधी स्वत:ला ओळखले पहिजे. जो स्वत:ला ओळखत नाही तो स्वत:चा शत्रू असतो, असे समजा. स्वत:ला ओळखणाऱ्याची प्रगती आणि विकास होतो. सुख, समृद्धी, यश त्याच्या दाराशी येते. या उलट आळशी, निष्काळजी, विकासापासून दूर पळणाऱ्या आणि आलेली संधी गमावणाऱ्याला कधीही सुख-शांती मिळत नाही.

विद्या, शौर्य, कौशल्य, शक्ती व धैर्य हे पाच गुण तुमचे मित्र आहे. नकारात्मक विचार आणि उदासीन दृष्टिकोनामुळे हे पाचही मित्र हरवतात. आणि तुम्ही आठवण केली तेव्हा तुमच्या मदतीला धावून येतात. पण, ते हरवल्यानंतर त्यांना शोधण्यासाठी बाहेर धाव न घेता स्वत:च्या अंतरंगात शोधा. कारण हरवलेली वस्तू हरवलेल्याच ठिकाणी सापडते हे लक्षात घ्या. दिवसाची सुरुवात नामस्मरण आणि नमस्काराने करा. कारण नमस्कार भगवंतालाही आवडतो. नेहमी हसतमुख राहा. त्यामुळे तुम्ही स्वत: तर आनंदी राहताच पण, तुमच्या संपर्कात येणाऱ्यालाही आनंद देता.

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १९५२ - माऊस ट्रॅप या अॅगाथा ख्रिस्तीच्या कथेवरील नाटकाचा पहिला प्रयोग अँबेसेडर लंडनमधील नाट्यगृहात झाला.

### राष्ट्रीय

- १२९६ - संत ज्ञानेश्वर यांनी समाधी घेतली.
- १६६४ - कुरटे या बेटावर शिवाजी महाराजांनी स्वहस्ते पायाचा चिरा बसवून सिंधुदुर्गाच्या बांधकामास शुभारंभ केला.
- २००२ - भारतीय वैद्यकीय सेवेच्या अतिरिक्त संचालकपदी एअरव्हाइस मार्शल पी. बंदोपाध्याय यांची नियुक्ती. हे पद मिळविलेल्या त्या पहिल्या महिला अधिकारी आहेत.
- २००८ - नवी मुंबईतील खारघर येथे ज्येष्ठ निरूपणकार नानासाहेब धर्माधिकारी यांचा मरणोपरांत महाराष्ट्रभूषण पुरस्काराने गौरव करण्यात आला. नानासाहेब धर्माधिकारी यांचे सुपुत्र आप्पासाहेब धर्माधिकारी यांनी हा पुरस्कार स्वीकारला.


### जन्म

- १८४४ - कार्ल बेंझ, अंतर्ज्वलनयंत्रणा असलेल्या आद्य मोटरगाडीचा निर्माता.
- १९२१ - नटवर्य भालचंद्र पेंढारकर.
- १९५२ - इम्रान खान, पाकिस्तानचा क्रिकेटपटू.

### निधन

- १९८० - साहिर लुधियानवी, हिंदी चित्रपटसृष्टीतील प्रसिद्ध गीतकार.
- १९६२ - दासगूण महाराज (गणेश दत्तात्रय सहस्रबुद्धे).
- १९८४ - यशवंतराव चव्हाण, साहित्यप्रेमी, राजकारणी, भारताचे माजी उपपंतप्रधान.

## दै. समर्थ गांवकरी जम्बो शब्दकोडे क्र. ४५



**आडवे शब्द**

१. अत्यंत नीच, दुष्ट
४. मंत्रीमंडळ
७. बांगड्यांचा व्यवसाय करणारी एक जमात
१०. बायको
११. झकास, छान
१२. लाकूड कापण्याचे दातेरी हत्यार
१४. एकूण एक सर्व
१५. घटस्फोट
१६. प्रतिष्ठा, समाजातील वजन
१७. लोणी
२०. मिंधा
२२. लहान मुलगी, कुमारी
२३. धनी, स्वामी
२५. केळ्यांचा गुच्छ
२६. अग्रलेख
२८. नृत्यकलेचा देव
३०. बगळा
३२. जरचा जोडीदार
३३. देवाशी केलेला करार
३४. तालासुरात बांधलेले
३५. परमेश्वर
३७. वाणी
३९. मनाचा ओढा
४२. दुलई
४३. पत्त्यातील जोडपे
४४. मराठीत कोर्ट
४५. खून
४६. एक ज्वालाग्रही खनिज
४८. स्वयंप्रकाशी कीटक
४९. फुललेला, फुगीर
५१. जागणे, देवाच्या नावाने जागरण करणे
५२. वेल
५४. डोंगर
५६. दचकणे, घाबरणे
५८. मोठ्या मनाचा
५९. संधी, फुरसत
६०. असंख्य, पुष्कळ
६२. जन्म-मृत्यू
६४. जिवलग मित्र
६७. धमनी, रक्तवाहिनी
६८. रसाळ
६९. नमनीय
७२. कंटाळवाणी (बडबड)
७४. भात शिजतानाचा आवाज
७६. त्वरित, अचानक
७७. प्रत्येक दिवशी
७८. वाळवी, उणीव

**उभे शब्द**

१. फार मोठे
२. योग्य, उचित
३. दहावी रास
४. नवऱ्याची दुसरी पत्नी
५. मिग्रन
६. प्रजा
७. पूर्ण बदल
८. प्रामाणिक, सज्जन
९. रत्न
१०. विद्युल्लता
१३. दागदागिने
१५. पुष्कळ, अति
१६. पळून जाणे
१८. रंग
१९. थेट, सरळ
२१. जाणीव, लाज
२२. शिल्लक राहिलेली रक्कम
२३. मानलेली मुलगी
२४. महाभयंकर
२७. दार
२९. विजयाचा नामघोष
३०. बांधलेला
३१. पं.भीमसेन जोशी यांचे गुरु
३६. जमीन मोजण्याची पट्टी
३८. गवत
४०. नाश पावणे (वा.प्र.)
४१. वडीलांची बहीण
४३. कणखर, ओबडधोबड
४५. पोलीस शिपाई
४७. आजूबाजूला
५०. वळू
५३. धातूचा धागा
५४. एक केशरी गराचे फळ
५५. मुलायम
५६. चविष्ट
५७. मागील अंगणाचा दरवाजा
५८. पार्वतीचे एक नाव
६१. फुलपाखराची प्रथमावस्था
६२. लोकांचा कल
६३. सामुदायिक रडणे
६५. पदार्थातील अतिमीठाची चव
६६. चरण
७०. रूचिहीन
७१. संधी
७३. दगडवरील घाव, पाणी साठवण्याचे साधन
७५. सडक,मार्ग

उत्तर उद्याच्या अंकात

**शब्दकोडे क्र. ४३ चे उत्तर**

आडवे उत्तर : १.मैफल ३.कसई ५.रामभरोसे ६अ.ताप ८.वनराज ९.बाग १०.कुसळ ११.नरक १३.मरातब १५.बातमीदार १७.सरबत १९.हतबल २१.सणवार २३.कोंना २४.देह २५.चकमक २८.आवाज ३०.याचक ३१.धडक ३३.वग ३५.नाराज ३७.मदत ३८.माकड ३९.साम ४०.सतावणे ४१.करपाशी ४३.कसा ४६.गमला ४८.सडाफटिंग ४९.पलायन ५१.नग ५२.पत्ता कट ५३.तरबेज ५६.तरट ५८.सुमन ५९.मटका ६०.शनिवार ६२.साधना ६४.तरुणाई ६५.रकमपात ६६.राम ६७.सपना ६८.घर ७०.धस ७२.कारभार ७५.ठोंब्या ७६.गपकन ७७.फूस ७८.कुंतल ७९.तारा

उभे उत्तर : १.मैदान २.लवकर ३.करामत ४.साजरा ५.राग ६.भरात ६अ.तास ७.पळभर ९.बाबत १०.कुरण १२.रसना १४.तहहयात १५.बालक १६.दास १८.बाटवा २०.बचकभर २२.वाणवसा २३.महिना २६.मधमाशी २७.कडक २८.आजतगाजत २९.जमणे ३२.कडकडाट ३४.गमनागमन ३६.रास ४१.कलागत ४२.पाचपट ४४.साफ ४५.फापटपसारा ४७.मन ४८.सकटनिकट ५०.नरम ५४.बेट ५५.जकातनाका ५७.रसोईघर ५८.सुरपारंबी ६०.शर ६१.वाम ६३.धपधप ६७.सबब ६९.गोबरा ७१.सक ७३.रफू ७४.भास ७४अ.छत

# शिवसेनेच्या उमेदवारांच्या प्रचाराचा शुभारंभ

**श्रीगोंदा तालुका : (समर्थ गांवकरी)**

मा. नगराध्यक्ष मनोहर पोटे श्रीगोंदा शहराची अस्मिता आहे गेल्या साडेसात वर्षाच्या नगराध्यक्ष पदाच्या माध्यमातून या दांपत्याने शहराचा विकास केला नव नवीन योजना आणल्या येथील नागरिक उत्स्फूर्तपणे शिवसेनेच्या पाठीशी असून शिवसेनेचा पॅनल निश्चित विजयी होईल असा विश्वास शिवसेना रॅली नंतर प्रचार शुभारंभ करताना श्रीगोंदा कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती अतुल लोखंडे यांनी व्यक्त केला.



लोखंडे म्हणाले नगर परिषद निवडणुकीत ४ पॅनल तयार झाले विरोधातील तिन्ही पॅनल नेतृत्व हे शहराबाहेरील आहेत केवळ मनोहर पोटे यांना विरोध करून शहर विकासाची घोड दौड थांबवण्याचा त्यांचा मनसुबा आहे पण नागरिक सर्वांची भूमिका ओळखून असून शिवसेनेच्या पाठीशी उभे राहतील आता शिवसैनिकांनी मतदान पार पडे पर्यंत प्रचारात भाग घ्यावा. शिवसेना जिल्हा उप प्रमुख अनिल शिंदे यांनी बोलताना रॅलीला मिळालेला प्रतिसाद हि निवडणूक जिंकण्याची नांदी असून नागरिक शिवसेने बरोबर आहेत याचे हे द्योतक आहे. दिलीप सातपुते यांनी बोलताना पोस्टल मतदान तसेच आपल्या समर्थकांच्या मतदाना बाबत जागरूक रहावे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विकास निधी दिल्याने श्रीगोंदा शहराचा विकास झाला असे सांगून शहरात आणि वाडी वस्तीवर फिरताना मनोहर पोटे यांनी केलेला विकास दिसत असल्याने नागरिक खुश आहेत मतदान दिवशी पर्यंत आता कार्यकर्त्यांनी जागरूक रहावे.

मा. नगराध्यक्ष मनोहर पोटे म्हणाले कि शहराने स्थानिक नेतृत्व विकासकामामुळे स्वीकारले आहे स्वतंत्र पॅनलला पाठिंबा वाढत आहे. नगर परिषद हद्दीत विकासासाठी नगरविकास खाते महत्वाचे असते आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या कडे नगर विकास खाते आहे त्यांनी आजपर्यंत निधी दिला त्यांनी शब्द दिला आहे की श्रीगोंदा नगर परिषद नगराध्यक्ष पद सह सर्व जागा जिंका जिल्ह्यात श्रीगोंदा नगर परिषद विकासात अग्रेसर राहील असा निधी देऊ.



आळंदी : येथील श्रीमती लक्ष्मीबाई विठ्ठलराव दुराफे विद्यालयांत राष्ट्रीय शैक्षणिक धोरण – २०२० ( NEP ) या शैक्षणिक धोरणा नुसार शिक्षण हे केवळ ज्ञानार्जना पुरते मर्यादित न राहता विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचे प्रभावी माध्यम असावे. या दृष्टिकोनातून शाळा स्तरावर 'विद्यार्थी समूह' उपक्रम अंतर्गत राष्ट्रीय प्रेस दिनाचे आयोजन शालेय मुलांमध्ये समाज प्रबोधन करीत करण्यात आले.

## थोडक्यात बातम्या...

### श्रीमंत राजमाता विजयाराजे शिंदे कन्या विद्यालयात ओपन हाऊस उत्साहात संपन्न



श्रीगोंदा तालुका (स. गांवकरी) : श्रीगोंदा येथील श्रीमंत राजमाता विजयाराजे शिंदे कन्या विद्यालयात इयत्ता पाचवी ते दहावीच्या विद्यार्थिनींसाठी आयोजित करण्यात आलेला ओपन हाऊस कार्यक्रम शनिवार दिनांक 22 नोव्हेंबर 2025 रोजी उत्साहात पार पडला. विद्यार्थिनींच्या शैक्षणिक प्रगतीचा आढावा घेण्यासाठी तसेच पालक-शिक्षक संवाद वृद्धिंगत करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला.कार्यक्रमाची सुरुवात विद्यालयाच्या मुख्याध्यापिका श्रीम. वर्षा भोईटे यांच्या स्वागतपर पालक भेटीगाठीने झाली. त्यांनी उपस्थित पालकांना शैक्षणिक वर्षातील विविध उपक्रमांची माहिती देत विद्यार्थिनींच्या सर्वांगीण विकासासाठी पालक-शिक्षक सहकार्याची गरज अधोरेखित केली. ओपन हाऊस दरम्यान पालकांनी आपल्या मुलींची उत्तरपत्रिका,स्पर्धा परीक्षेतील यश, व रयत गुरुकुल प्रकल्प तसेच इतर शैक्षणिक उपक्रम पाहून समाधान व्यक्त केले. वर्ग शिक्षकांनी प्रत्येक विद्यार्थिनीच्या गुण-दोषांबाबत, सुधारणा क्षेत्रांबाबत तसेच पुढील अभ्यास कसा अधिक परिणामकारक होईल याबाबत पालक व विद्यार्थीनीना मार्गदर्शन केले.विद्यार्थिनींनीही आपल्या पालकांना शालेय उपक्रमांतील सहभाग, मिळवलेली यशे आणि भविष्यातील उद्दिष्टे अभिमानाने सांगितली. शाळेत तयार केलेल्या कार्यक्रमाचे आयोजन विद्यालयातील सर्व शिक्षकवर्गाने संयुक्तरीत्या केले. पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद आणि विद्यार्थिनींचा उत्साह यामुळे ओपन हाऊस अत्यंत यशस्वी झाल्याची भावना पालकांनी व्यक्त केली. उपस्थित पालकांचे विद्यालयाने आभार मानले.



### सिद्धेश्वर माध्यमिक विद्यालयाचा माजी विद्यार्थी ओम गायकवाड यांचा सन्मान

श्रीगोंदा तालुका (स. गांवकरी) : श्रीगोंदा तालुक्यातील लिंपणगाव येथील श्री सिद्धेश्वर माध्यमिक विद्यालयामध्ये शनिवार दिनांक 22 नोव्हेंबर 2025 रोजी गणित विज्ञान अपूर्व प्रदर्शनाचे आयोजन आयोजन करण्यात आले होते यावेळी विद्यालयाचा माजी विद्यार्थी विद्यालयाचा माजी विद्यार्थी ओम गणपत गायकवाड ओम गणपत गायकवाड या विद्यार्थ्यांची या विद्यार्थ्यांची भारतीय भारतीय सैन्य दलात निवड झाल्याबद्दल विद्यालयाच्या वतीने या माजी विद्यार्थ्यांचा गौरव करून त्याला पुढील कार्यास शुभेच्छा व्यक्त केल्या. यावेळी माजी सरपंच अरविंद कुरुमकर, सेवा सोसायटीचे चेअरमन रामभाऊ टुले, नंदु ठोमसकर, जयसिंग शेंडे, शामराव लष्करे, म्हसुदेव कुसाळकर, किरण भोंडवे, बबन बडवे, बबनराव भगत, भगवान ओहोळ, आदी उपस्थित होते. याप्रसंगी विद्यालयाचे मुख्याध्यापक भास्करराव जगताप प्रास्ताविक केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिवाजीराव नागवडे सर यांनी केले. व आभार व पवळ सरांनी मानले सदरचा कार्यक्रम मुख्याध्यापक व सर्व सेवकवृंद विद्यार्थी यांच्या समवेत अतिशय उत्साहाच्या वातावरणामध्ये पार पडला. या मेळाव्यास गावातील प्रतिष्ठित नागरिक, समस्त पालक व विद्यार्थी उपस्थित होते.आभार पवळ सर यांनी मांडले.

### विजयाच्या औचित्याने 'यूवा'तर्फे लिमिटेड एडिशन लाँग बुक्स सादर




पुणे (स. गांवकरी) : 2 नोव्हेंबर 2025 रोजी भारताच्या महिला क्रिकेट संघाने स्पर्धेच्या 50 वर्षांच्या इतिहासात आयसीसी महिला विश्वचषक जिंकून प्रथमच इतिहास घडवला. या ऐतिहासिक विजयाचा सन्मान करण्यासाठी नवनीत एज्युकेशन लिमिटेडच्या 'यूवा'तर्फे 'विमेन्स वर्ल्ड कप लाँग बुक्स' (ए4, 172 पृष्ठे) ही लिमिटेड एडिशन सीरिज सादर करण्यात आली आहे. या खास कलेक्शनच्या निमित्ताने संघाच्या जिद्दीचा, चिकाटीचा आणि भारतभरातील क्रिकेटप्रेमींना एकत्र आणणाऱ्या पॅशनचा गौरव करण्यात आला आहे. #TeamIndia या अभिमानास्पद क्षणाने लाखो भारतीयांचे हृदय आनंद आणि गर्वाने भरून आले. कारण या संघाची मेहनत, चिकाटी आणि एकीमुळे देशाला हे वैभव प्राप्त झाले आहे. या सीरिजमधील प्रत्येक वहीमध्ये, आपल्या महिला चॅम्पियन्सचा आत्मविश्वास व अभिमान प्रतिबिंबित करणाऱ्या दृश्यांसह या ऐतिहासिक विजयाचा उत्साह टिपण्यात आला आहे. #YouvaGirlPower नारीशक्ती आणि सबलीकरणाचा गौरव करणाऱ्या प्रभावी दृश्यरचनेमुळे कव्हर डिझाइन उठून दिसते आणि ताकद, साहस आणि आत्मविश्वास असेल तर त्यांना कोणतेही ध्येय साध्य करणे शक्य आहे, याची तरुण वाचकांना आठवण करून देते. हे केवळ एक लाँग बुक नाही तर चिकाटी व संघभावनेने इतिहास घडवता येतो, याचे प्रत्येक महत्त्वाकांक्षी विद्यार्थी आणि तरुणांना आठवण करून देणारे स्मरणचिन्ह आहे. #DreamBelieveAchieve 'यूवा'चे चीफ स्ट्रॅटजी ऑफिसर अभिजीत सान्याल म्हणाले, "भारतात क्रिकेट हा केवळ एक खेळ नाही तर ती भावना आहे.

# जिल्हाभरातून शुभेच्छांचा वर्षाव; सुजय दादांचा अभिष्टचिंतन सोहळा उत्साहात

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

युवा नेते व माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्यानिमित्त जिल्ह्यात आज दिवसभर शुभेच्छांचा उत्साह उसळला. जनसेवा फाउंडेशन व डॉ. सुजय विखे पाटील युवा मंच यांच्या वतीने दोन ठिकाणी आयोजित करण्यात आलेल्या भव्य कार्यक्रमास कार्यकर्ते, पदाधिकारी आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली.



सकाळी ९ ते १२ या वेळेत डॉ. धनंजयराव गाडगीळ सभागृह, प्रवरानगर येथे शुभेच्छा स्वीकार सोहळा पार पडला. त्यानंतर दुपारी ३ ते सायंकाळी ६ या वेळेत अहिल्यानगर येथील विळद घाट, जिमखाना हॉल (डॉ. विखे पाटील फाउंडेशन) येथे दुसरा सोहळा आयोजित करण्यात आला. दोन्ही ठिकाणी डॉ. सुजय पाटील यांनी स्वतः उपस्थित राहून कार्यकर्त्यांच्या मनःपूर्वक शुभेच्छा स्वीकारल्या.

कार्यक्रमास जिल्ह्यातील विविध भागांतून युवक, महिला, ज्येष्ठ नागरिक, सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी आणि कार्यकर्त्यांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती. प्रत्येक ठिकाणी उत्साह, जयघोष आणि स्वागताचे विविध उपक्रम पाहायला मिळाले.

या अभिष्टचिंतन सोहळ्याच्या निमित्ताने राज्यातील अनेक मान्यवरांनी शुभेच्छा दिल्या. राज्याचे कॅबिनेट मंत्री, राज्यमंत्री तसेच महाराष्ट्रातील अनेक आमदार–खासदार यांनी फोनद्वारे आणि प्रत्यक्ष हजेरी लावून डॉ. सुजय पाटील यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. त्यांच्या नेतृत्वगुणांचे, विकासदृष्टीचे आणि कार्यकर्त्यांशी असलेल्या आत्मीयतेचे विशेष कौतुकही मान्यवरांनी व्यक्त केले.

डॉ. सुजय पाटील हे जिल्ह्याच्या प्रगतीचे भविष्यदर्शी नेतृत्व आहे,अशा प्रतिक्रिया अनेक मान्यवरांकडून व्यक्त झाल्या. काही कार्यकर्त्यांनी क्रेनद्वारे भव्य पुष्पहार अर्पण करत दादांप्रति अत्यंत प्रेम व आदर व्यक्त केला. ढोल-ताशांच्या गजरात, पारंपरिक नृत्यात, घोषणांनी व आकर्षक सजावटीने संपूर्ण परिसर दणाणून गेला. सुजय दादांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा या गजरात वातावरण अधिकच उत्साहपूर्ण झाले.

दोन्ही ठिकाणच्या कार्यक्रमांचे उत्कृष्ट नियोजन आणि व्यवस्थापन जनसेवा फाउंडेशन तसेच डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाउंडेशन, विळद घाट यांनी शिस्तबद्ध पद्धतीने केले. स्वागत कक्ष, मार्गदर्शन पथके, वाहनतळ सुविधा, शिस्तबद्ध रांग व्यवस्थापन, सर्वत्र उत्तम आयोजन पाहायला मिळाले.

कार्यक्रम संपेपर्यंत शुभेच्छा देणाऱ्यांची रांग अखंड सुरू होती. कार्यकर्त्यांची आपुलकी, मान्यवरांचा सहभाग आणि जनतेची प्रेमळ उपस्थिती यांच्या संगमामुळे हा अभिष्टचिंतन सोहळा स्मरणात राहील असा भव्य आणि उत्साहपूर्ण ठरला.

जिल्ह्यातील युवा, महिला, ज्येष्ठ नागरिक, सामाजिक संस्था, विविध संघटनांचे प्रतिनिधी तसेच अनेक प्रतिष्ठित नागरिकांची लक्षणीय उपस्थिती यावेळी पाहायला मिळाली.

रहीमपूर येथील युवक कार्यकर्ते श्री. सचिन शिंदे व श्री. रवींद्र (पप्पू) गाढे यांनी डॉ. सुजयदादा विखे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त फ्लेक्स-बॅनर खर्च टाळून गावातील महिलांसाठी मोहटा देवी, मढी, शनी शिंगणापूर या ठिकाणी मोफत देवदर्शनाची व्यवस्था केली. आज सकाळी सर्व महिलांच्या उपस्थितीत दादांचा वाढदिवस साजरा करण्यात आला.

## अरूण आईस्क्रीम्स घेऊन आले आहेत आकर्षक आईस्क्रीम डोनट्स

**नवी दिल्ली : (समर्थ गांवकरी)**

या सीझनमध्ये,उत्तम गुणवत्ता असलेल्या दूध आणि क्रीम पासून आईस्क्रीम बनविण्याकरिता प्रसिद्ध असलेल्या तसेच कसाटा स्लाईस, आयकोन, आयबार, स्पायरल, बाईट्स, बॉल आईसक्रीम , आईस्क्रीम सॅन्डविच आणि पुश-अप कॉटन कॅन्डी सारख्या आगळ्या वेगळ्या आईस्क्रीम बनविण्यात अग्रगण्य असलेल्या अरूण आईक्रीम्स नी, आपली अगदी नवीन आणि आगळीवेगळी अशी श्रेणी बाजारात आणली आहे ज्याचे नाव आहे- अरूण आईसक्रीम डोनट.



या नव्या कल्पक अशा श्रेणीमुळे आईस्क्रीम जगतात सगळ्यांना आवडेल असा एक वेगळेपणा आणला आहे. एका चाव्यात खाता येईल अशी रचना असलेले हे आईस्क्रीम ग्राहकांना अपेक्षित असलेला ताजेपणा देणारं आहे ज्यामुळे आईस्क्रीम खायला आवडणाऱ्यांना त्याचा आस्वाद हवा हवासा वाटेल आणि त्यांना स्वत:कडे आकर्षित करेल.

## 'स्वारातीम'चा संघ आंतरविद्यापीठ सेंट्रल झोन युवक महोत्सवासाठी रवाना

**नांदेड : (समर्थ गांवकरी)**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडचा संघ असोसिएशन ऑफ इंडियन युनिव्हर्सिटीज, दिल्ली आयोजित ३९व्या आंतरविद्यापीठ आंतरराज्यस्तरीय सेंट्रल झोन युवक महोत्सवात सहभागी होण्यासाठी रवाना झाला. सदर महोत्सव २५ ते २९ नोव्हेंबरदरम्यान एम.जी.एम. विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर येथे पार पडणार आहे. कुलगुरू डॉ. मनोहर चासकर व प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन यांच्या मार्गदर्शनाखाली आणि विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. राजेश्वर दुडूकनाळे यांच्या नेतृत्वात विद्यापीठातील कलावंतांचा संघ विविध साहित्यिक, सांगीतिक, नाट्य, नृत्य, तसेच ललितकला प्रकारांत सहभाग नोंदवणार आहे. तज्ञ प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी आदिवासी लोकनृत्य, संकल्पना नृत्य, एकांकिका, वादविवाद, वक्तृत्व, सुगम व शास्त्रीय गायन, शास्त्रीय सुरवाद्य, लोकसंगीत, आणि तालवाद्य यांसह विविध कलाप्रकारांची तयारी केली आहे. गतवर्षी राज्यस्तरीय 'इंद्रधनुष्य' युवक महोत्सवात आदिवासी नृत्य व लोकसंगीत वाद्यवृंदात उल्लेखनीय यश संपादन करून 'स्वारातीम' संघाने स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली होती. यावर्षीच्या महोत्सवासाठी प्रशिक्षक म्हणून डॉ. संदीप काळे व किरण देशमुख (वक्तृत्व, वादविवाद), सिद्धार्थ नागठाणकर (ललित कला), डॉ. शिवराज शिंदे (संगीत), दिलीप डोंबे (नाट्य व संकल्पना नृत्य), संदेश हटकर (आदिवासी नृत्य), डॉ. पांडुरंग पांचाळ व समाधान राऊत (लोकसंगीत) यांनी काम पाहिले. संघ व्यवस्थापक म्हणून डॉ. संदीप काळे व प्रा. माधुरी पाटील यांच्यावर जबाबदारी सोपविण्यात आली असून ६५ जणांचा कलावंत, प्रशिक्षक व व्यवस्थापकांचा संच 'सेंट्रल झोन' महोत्सवासाठी रवाना झाला आहे. यावेळी कुलगुरू डॉ. मनोहर चासकर, प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन यांनी संघाला शुभेच्छा दिल्या. तसेच कुलसचिव डॉ. डी. डी. पवार, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक हुशारसिंग साबळे, अधिष्ठाता डॉ. एम. के. पाटील, वित्त व लेखाधिकारी डॉ. भालचंद्र पराग, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. राजेश्वर दुडूकनाळे, राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. मारुती गायकवाड आणि जनसंपर्क अधिकारी डॉ. अशोक कदम यांनीही विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.




## श्रेयसचा नवीन ईपी अंतरराष्ट्रीय रिलीज – दमदार संगम

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

प्रोड्युसर मिस्टर डॉससोबत तयार केलेल्या या तीन गाण्यांच्या ईपीमध्ये "नाच", "बिक्कड" आणि "जंगल" यांचा समावेश असून ही गाणी दाखवतात की खऱ्या भावनेतून तयार झालेले संगीत सीमा ओलांडूनही लोकांपर्यंत पोहोचू शकते.

'तांबडी चांबडी' मुळे प्रसिद्ध झालेला श्रेयस सागवेकर आता आपल्या सर्वात मोठा आणि महत्त्वाकांक्षी प्रकल्प नवीन ईपी अंतरराष्ट्रीयसह परतला आहे. सुप्रसिद्ध प्रोड्युसर मिस्टर डॉससोबत मिळून तयार केलेला हा ईपी मराठी संगीत आता जगभर पोहोचायला तयार आहे. भारतातील वाढत्या हिप-हॉप सीनमध्ये




आघाडीचा आवाज म्हणून श्रेयसच्या पुढच्या टप्प्याची ही सुरुवात आहे. महाराष्ट्राच्या मातीशी घट्ट जोडलेला आणि जागतिक मंच लक्षात घेऊन तयार केलेला अंतरराष्ट्रीय हा ईपी ऊर्जेने भरलेला, प्रामाणिक आणि पूर्णपणे घरगुती ओळख जपणारा स्वदेशी प्रकल्प आहे. "नाच", "बिक्कड" आणि "जंगल" या तीन गाण्यांतून श्रेयसने प्रभावी मराठी कथनशैलीला जागतिक दर्जाच्या प्रोडक्शनसोबत मिसळून एक तल्लख, लगेच मनात बसणारा आणि अत्यंत वैयक्तिक असा साउंड तयार केला आहे. प्रत्येक गाणे स्थानिक रस्त्यांवरून सुरू झालेल्या प्रवासात जगभर पोहोचण्याची भावना वेगवेगळ्या प्रकारे दाखवते. "नाच" हे स्वातंत्र्य, आनंद आणि मोकळेपणाचा उत्सव आहे. "बिक्कड" हे कठोर परिश्रम, चिकाटी आणि स्वतःवरचा मजबूत विश्वास व्यक्त करते.

"जंगल" हे कच्ची ताकद, जगण्यासाठीची धडपड आणि स्वतःचं स्थान निर्माण करण्याची जिद्द दाखवते. ही तीनही गाणी एकत्र येऊन आनंद, अभिमान, संघर्ष आणि स्वतःच वेगळेपण यांची एक सुंदर कहाणी सांगतात.

## संगमनेर सेवा समितीच्या उमेदवारांना नागरिकांचा मोठा पाठिंबा

**संगमनेर : (समर्थ गांवकरी)**

लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली सुसंस्कृत व वैभवशाली असलेले संगमनेर शहर मागील एक वर्षापासून अशांत झाले आहे.

शहरात अमली पदार्थांसह सुरक्षितता धोक्यात आली असून संगमनेर शहरात वाढलेली गुंडगिरी दडपशाही तस्करी थांबवून संगमनेरला पुन्हा गत वैभव प्राप्त करून देण्यासाठी संगमनेर सेवा समितीचे सर्व उमेदवार कटिबद्ध राहतील असा विश्वास आमदार सत्यजित तांबे यांनी दिला असून सेवा समितीच्या सर्व उमेदवारांना नागरिकांचा मोठा पाठिंबा मिळत आहे. संगमनेर नगरपालिकेच्या निवडणुकीत आमदार सत्यजित तांबे यांनी संगमनेर सेवा समितीच्या उमेदवारांच्या प्रचारात जनता नगर, गणेश नगर, विद्यानगर, रंगार गल्ली या विविध प्रभागांमध्ये सेवा समितीच्या उमेदवारांच्या प्रचार केला.

# राष्ट्रवादीला मत म्हणजे विकासाला मत : अजित दादा पवार

### नगराध्यक्ष सहज सर्व नगरसेवक शहराच्या विकासासाठी सक्षम नेतृत्व असून ते सर्व समाजांना सोबत घेऊन चालतील

**कंधार तालुका : (समर्थ गांवकरी)**

कंधार नगरपरिषद सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा राज्याचे उपमुख्यमंत्री मा.ना अजितदादा_पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेसचे नगराध्यक्ष पदाचे अधिकृत उमेदवार #स्वप्रिल_उर्फ_हनुमंत_विश्वनाथ_लुंगारे यांच्या प्रचारार्थ आयोजित भव्य जाहीर सभा मोठ्या उत्साहात पार पडली.



या सभेला उपमुख्यमंत्री मा. अजितदादांनी संबोधित करताना, स्वप्रिल लुंगारे हे कंधार शहराच्या विकासासाठी सक्षम नेतृत्व असून ते सर्व समाजांना सोबत घेऊन चालतील, असा विश्वास व्यक्त केला. तसेच कंधार शहरातील मतदारांनी आगामी निवडणुकीत '#घड्याळ' चिन्हावर विश्वास ठेवून मतदान करावे आणि शहराच्या विकासाला गती द्यावी, असे आवाहन केले.

कंधार हे सांस्कृतिक, ऐतिहासिक व धार्मिक वैविध्य जपणारे शहर असून इथला बंधुभाव आणि सौहार्दाचा वारसा जपणे ही सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे. त्यासाठी इथल्या विकासकामांसाठी आर्थिक मदत कमी पडणार नाही, याची मा. अजितदादांनी खात्री दिली.

या सभेस माजी खासदार भास्करराव पाटील खतगावकर, माजी आमदार तथा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शहर जिल्हाध्यक्ष ओमप्रकाश पोकर्णा, माजी आमदार मोहनराव हंबर्डे, माजी आमदार सुभाषराव साबणे, माजी आमदार अविनाशराव घाटे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे ग्रामीण दक्षिण जिल्हाध्यक्ष शिवराज पाटील होटाळकर, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे उत्तर जिल्हाध्यक्ष बाळासाहेब पाटील रावणगावकर, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे शहर कार्याध्यक्ष माधव पावडे, श्रीमती चित्राताई लुंगारे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी प्रदेश सरचिटणीस प्रवीण पाटील चिखलीकर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी प्रदेश सरचिटणीस दिलीपराव धर्माधिकारी, उत्तमराव सोनकांबळे, सुनंदाताई जोगदंड, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे कंधार नगरपालिकेचे उमेदवार हनुमंत उर्फ स्वप्रिल पाटील लुंगारे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी लोहा नगरपालिकेचे उमेदवार शरद नामदेवराव पवार, बालाजीराव शिंदे माणिकराव मुकदम, मन्नान चौधरी, जफरोद्दिन बाहोद्दिन, किशनराव डफडे, सचिन पाटील चिखलीकर, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे कंधार तालुका अध्यक्ष मनोहर पाटील भोसीकर, लोहा तालुका अध्यक्ष छत्रपती स्वामी, प्राध्यापक सुनील नानवटे यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

# मेनिंजायटीस लसीकरणाद्वारे तरुणांचे जीवन वाचवणे : डॉ. अमिता कौल

पुणे : (समर्थ गांवकरी)



ब्रेन फीव्हर म्हणून ओळखला जाणारा मेनिंजायटिस हा लसीकरणाद्वारे टाळता येणारा गंभीर संसर्ग आहे, जो विशेषतः लहान मुलांसाठी मोठी आरोग्याची चिंता आहे. वर्ल्ड मेनिंजायटिस डे दरवर्षी 5 ऑक्टोबर रोजी साजरा केला जातो. याचा उद्देश या आजाराबाबत जनजागृती करणे, लवकर निदानाचे महत्त्व अधोरेखित करणे आणि लसीकरणाद्वारे या आजाराची प्रतिबंधात्मक शक्यता वाढवणे हा आहे. दरवर्षी जगभरात २.५ दशलक्षांपेक्षा अधिक मेनिंजायटिसची प्रकरणे नोंदवली जातात. या आजारामुळे मृत होणाऱ्यांपैकी जवळपास ७० टक्के मुले पाच वर्षांखालील असतात, यामुळे हा गंभीर जागतिक आरोग्यसंकट बनले आहे. मेनिंजायटिस म्हणजे मेंदू व मज्जारज्जूला वेढणाऱ्या आवरणांमध्ये (मेनिंजीस) सूज येणे. हा प्रामुख्याने बॅक्टेरियल, फंगल किंवा व्हायरल संसर्गामुळे होतो. मेनिंजायटिसची लक्षणे त्याच्या कारणांवर, आजाराच्या स्वरूपावर (तीव्र, उप-तीव्र किंवा दीर्घकालीन), मेंदूच्या सहभागावर (मेनिंगो-एन्सेफेलाइटिस) आणि सिस्टमिक गुंतागुंतींवर (उदा. सेप्सिस) अवलंबून बदलतात. सामान्य लक्षणांमध्ये मान आखडणे, ताप, संभ्रम किंवा वर्तनात बदल, डोकेदुखी, मळमळ आणि उलट्या यांचा समावेश होतो. कमी प्रमाणात आढळणारी लक्षणे म्हणजे फिट्स येणे, कोमा आणि न्यूरोलॉजिकल अडचणी (उदा. ऐकण्याची/पाहण्याची क्षमता कमी होणे, संज्ञानात्मक समस्या किंवा हात-पायांमध्ये कमजोरी). भारत मेनिंजायटिसमुळे होणाऱ्या मृत्यूंच्या संख्येत जगातील अव्वल तीन देशांमध्ये समाविष्ट आहे. तीव्र बॅक्टेरियल मेनिंजायटिसचे तीन प्रमुख कारणीभूत सूक्ष्मजंतुंपैकी निसेरिया मेनिंगिटिडिस उपचारानंतरही सुमारे १५ टक्के आणि उपचार न घेतल्यास ५० टक्क्यांपर्यंत मृत्यूदरासाठी जबाबदार आहे. भारतीय दोन वर्षांखालील मुलांमध्ये निसेरिया मेनिंगिटिडिस* संसर्गाचे प्रमाण वाढत असल्याचेही अभ्यासातून स्पष्ट झाले आहे. डॉ. अमिता कौल, कन्सल्टंट पेडियाट्रिशियन आणि निओनेटोलॉजिस्ट, सूर्या मदर अँड चाइल्ड सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल, पुणे यांच्या मते, "आपल्याकडे मेनिंजायटिसच्या सर्वात धोकादायक स्ट्रेन्सपासून संरक्षण देणाऱ्या लसी उपलब्ध आहेत आणि जागतिक पातळीवरील उपक्रमांमुळे प्रकरणांमध्ये मोठी घट झाली आहे. लसीकरण कार्यक्रम बळकट करणे आणि कुटुंबांना जागरूक करणे हे या अंतरावर मात करण्यास आणि टाळता येण्यासारख्या दुर्घटना रोखण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे.




नांदेड- पुरुषांच्या आरोग्यावर आणि कल्याणावर लक्ष केंद्रित करण्यासाठी, लिंग समानतेला प्रोत्साहन देण्यासाठी, समाजात पुरुषांच्या सकारात्मक योगदानाचा उत्सव साजरा करण्यासाठी आणि प्रत्येकासाठी एक चांगले आणि सुरक्षित स्थान निर्माण करण्यासाठी तसेच सकारात्मक पुरुष आदर्शांना प्रोत्साहन देण्यासाठी महिलांच्या पुढाकारातून आंतरराष्ट्रीय पुरुष दिनाचे शहरात आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सेवानिवृत्त उपप्राचार्य प्रा. प्रल्हाद हिंगोले हे होते तर प्रमुख अतिथी म्हणून साहित्यिक डॉ. राम वाघमारे, पत्रकार संजय खाडे, उद्योजक अनुरत्न वाघमारे, कवी नागोराव डोंगरे, प्रा. संजय नरवाडे, हेडकॉन्स्टेबल रवी लोहाळे, इंजि. लक्ष्मण लिंगापुरे, मिलिंद व्यवहारे आदिंची उपस्थिती होती.

## थोडक्यात बातम्या...



### बळीराजाच्या विविध मागण्यांसाठी देवळ्यात उबाठाकडून ठिय्या आंदोलन

देवळा (स. गांवकरी) : शिवसेना (उबाठा) यांच्या वतीने बाजार समिती आवार परिसरात शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी ठिय्या आंदोलन छेडण्यात आले. या आंदोलनाचे नेतृत्व शिवसेना तालुकाप्रमुख प्रशांत शेवाळे यांनी केले. स्वाभिमानी शेतकरी संघटना, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट), तसेच प्रहार संघटनेच्या प्रतिनिधींसह शिवसेना कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला.केंद्र सरकारच्या कृषी मुख्य आयोगाने मका खरेदीसाठी २४०० रुपये प्रति क्विंटल दर जाहीर केले असतानाही बाजारात केवळ १२०० ते १३०० रुपयांमध्ये मका विकला जात असल्याने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत आहे. मार्केट फेडरेशनने नोंदणीकृत शेतकऱ्यांचा मका खरेदी करण्यास टाळाटाळ केल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला. कांद्याच्या बाबतीतही स्थिती गंभीर आहे. उन्हाळी कांदा चाळीत मोठ्या प्रमाणात सडून उरलेला कांदा केवळ ७०० ते ८०० रुपये प्रति क्विंटल दराने विकला जात आहे. खर्चसुद्धा भरून न येत नसल्याने कांद्याला १००० रुपये प्रति क्विंटल अनुदान तात्काळ द्यावे, अशी मागणी करण्यात आली. याशिवाय निवडणूक काळात महायुती सरकारने दिलेली आश्वासने—शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करणे आणि कर्जमाफी—तातडीने पूर्ण करावीत, अशी मागणीही शिवसेनेच्या नेतृत्वाखाली प्रशासनाकडे करण्यात आली. आंदोलनकर्त्यांनी निवेदन देऊन शेतकऱ्यांच्या मागण्या तात्काळ मान्य करण्याचे आवाहन प्रशासनाला केले. या प्रसंगी प्रशांत शेवाळे (शिवसेना तालुकाप्रमुख), कुबेर जाधव (स्वाभिमानी शेतकरी संघटना राज्य समन्वयक), पंडित निकम (राष्ट्रवादी काँग्रेस तालुकाध्यक्ष), उमेश आहेर (प्रहार संघटना प्रतिनिधी) तसेच शिवसेना कार्यकर्ते विश्वनाथ गुंजाळ, गोरख गांगुर्डे, सुनील शिंदे, दादा माकोडी, विलास शिंदे, विजय आहेर, सोमनाथ शिंदे, खंडू जाधव, ईश्वर निकम, भरत देवरे, भास्कर आहिरे आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते. पोलीस निरीक्षक सार्थक नेहते यांच्यासह पोलीस प्रशासनाने यावेळी चोख बंदोबस्त दिला होता.

### विकासाबरोबर शांतता बंधुभाव टिकवणे गरजेचे - माजी मंत्री बाळासाहेब थोरात

संगमनेर (स. गांवकरी) : संगमनेर तालुक्याला व शहराला विकासाची मोठी परंपरा आहे. आपण सातत्याने निधी आणून मोठमोठी विकास कामे मार्गी लावली आहेत. शांतता सुव्यवस्था, बंधुभाव हे संगमनेर शहराचे वैशिष्ट्य राहिले आहे. मात्र मागील एक वर्षांमध्ये सर्वत्र अशांतता निर्माण झाली असून हे अत्यंत दुर्दैवी आहे. यापुढील काळात शहरात विकासाबरोबरच बंधुभाव व शांतता वाढीस लागेल यासाठी संगमनेरी सेवा समिती काम करेल अशा विश्वास लोकनेते माजी महसूल तथा कृषीमंत्री बाळासाहेब थोरात यांनी व्यक्त केला आहे. ग्रामदैवत लक्ष्मण बाबा यांचे दर्शन घेऊन सेवा समिती उमेदवारांचा प्रचार सुरू झाला यावेळी ते बोलत होते या प्रसंगी समवेत शिवसेनेचे अमर कतारी, उमेदवार कविता अमर कतारी शैलेश कलंत्री, अंबादास आडेप, पप्पू नेहुलकर, प्रकाश कलंत्री, काशिनाथ आडेप, राजाभाऊ अवसक, दत्तात्रय थोरात ,आकाश जेधे, लखन जेधे, सूरज बागे, सागर बागे ,शुभम परदेशी, ललित शिंपी, मयूर जाधव, अंकित परदेशी, विशाल भोईर ,भगवान घोडेकर, वेणू गोपाल कलंत्री, सतीश आडेप, गोविंद नागरे, किरण हासे, बाळासाहेब गुंजाळ, शंभू जवरे , गौरव जेधे, हर्षल जेधे, अल्ताफ शेख, रोहित वाळके यांच्यासह विविध पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी संगमनेरचे ग्रामदैवत लक्ष्मण बाबा यांचा आशीर्वाद घेतला याचबरोबर आय लव संगमनेर या सेल्फी पॉइंट समोर सर्व नागरिकांसमवेत फोटो घेतला.

# राजकारणात पूर्वीच्याकाळी वैचारिकता होती : सुजित झावरे पाटील



> राजकारणात मी सुजित दादांसोबत कधीही सक्रियपणे काम केले नाही परंतु त्यांच्याबद्दल नेहमीच आदर राहिला आहे. भोंद्रे गावचा विकासासाठी सुजित झावरे पाटलांच्या माध्यमातून प्रश्न सोडविणार आहे तसेच गावचा चेहरा मोहरा बदलण्यासाठी नेहमीच प्रयत्नशील राहणार आहे.
>
> **- अभिजीत झावरे (सरपंच, भोंद्रे)**

पारनेर : (समर्थ गांवकरी)

## भोंद्रे येथे श्री हनुमान मंदिर सभामंडप भूमिपूजन

पारनेर तालुका हा वैचारिक विचारांचा तालुका आहे येथे राजकारण समाजकारण करत असताना पूर्वीच्या राजकीय व्यक्तींनी कधीही एकमेकांचा द्वेष केला नाही राजकारणामध्ये वैचारिक पातळी जपली आता तसे दिसत नाही असे स्पष्ट मत जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुजित झावरे पाटील यांनी व्यक्त केले.

भोंद्रे येथील श्री.हनुमान मंदिर सभामंडप भूमिपूजन समारंभ सुजित झावरे पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी अमोल साळवे, किसन धुमाळ, उद्योजक प्रसाद झावरे, सरपंच अभिजित झावरे, उपसरपंच इंद्रभान झावरे, सदस्य गणेश झावरे, सदस्या शाकुबाई झावरे, व्हा.चेअरमन लहू झावरे, मा चेअरमन दिलीप झावरे, साईनाथ शेळके, संतोष झावरे, मा.सरपंच बबनराव शेळके, मा उपसरपंच राजेंद्र झावरे, मा उपसरपंच मारूती झावरे राजेंद्र पवार, बाबुराव झावरे गुरुजी, शंकर शेळके , डॉ अरूण झावरे,विशाल झावरे, शांताराम झावरे, बाळकृष्ण झावरे, प्रतिक झावरे , संदिप झावरे, जालिंदर झावरे,बाळासाहेब पवार, रमेश पवार ,सनी पवार, बाबा धोंडीबा झावरे, लक्ष्मण झावरे, शंकर झावरे साहेब, विकास झावरे, अनिकेत झावरे संदिप झावरे , प्रणव झावरे, मंगेश झावरे ,बाळासाहेब मुक्ताजी झावरे, अशोक झावरे ,राजेंद्र तुकाराम झावरे, मंगेश झावरे , शंकर झावरे, अनंत झावरे, रंगनाथ कोकाटे,गौतम पवार ठेकेदार निखिल दाते महिला वर्ग व ग्रामस्थ मोठया संख्येने उपस्थितीत होते.

भोंद्रे हे खऱ्या अर्थाने स्वाभिमानी गाव आहे. गावच्या विकासासाठी सर्वजण नेहमी एकत्र येतात यापुढील काळात काम करत असताना बोंद्रे गावातील विविध विकास कामांच्या संदर्भातील प्रश्न सोडवणार आहे गावाला जास्तीचा भरीव निधी मिळवून देण्यासाठी वरिष्ठ पातळीवर प्रयत्न करणार आहे. पक्ष न पाहता आपण सर्वांनी एकमेकांसोबत राहिले पाहिजे व सर्वसामान्यांचे प्रश्न सोडवले पाहिजे.



# शाश्वत विकास, पर्यावरण संवर्धन व 'नेट-झिरो' साठी पुढाकार

- आरती अहिवळे यांची माहिती
- ग्रीनएक्स एन्व्हायर्नमेंटल व ईपीडी ग्लोबल यांच्यात आंतरराष्ट्रीय सामंजस्य करार

पुणे : (समर्थ गांवकरी)

शाश्वत विकास, पर्यावरणाचे संवर्धन, कार्बन उत्सर्जनावर नियंत्रण मिळवण्यासह २०७० पर्यंत भारताने ठेवलेले 'नेट-झिरो' चे उद्दिष्ट्य गाठण्यासाठी प्रयत्नशील आहोत. हरित व पर्यावरणपूरक उद्योगांना चालना देण्यासाठी पुणेस्थित ग्रीनएक्स एन्व्हायर्नमेंटल व नॉर्वेस्थित ईपीडी ग्लोबल यांच्यातील भागीदारी महत्वपूर्ण ठरेल. शाश्वत विकासासाठी घेतलेला हा पुढाकार आहे," अशी माहिती ग्रीन सोल्यूशन ग्रुप ऑफ इंडस्ट्रीजचे व्यवस्थापकीय संचालक सागर अहिवळे आणि आरती भोसले-अहिवळे दिली.

ग्रीनएक्स एन्व्हायर्नमेंटल आणि ईपीडी ग्लोबल यांच्यामध्ये पर्यावरणीय उत्पादन घोषणेची ( एन्व्हायर्नमेंटल प्रॉडक्ट डिक्लेरेशन-ईपीडी) सेवा उपलब्ध करून देण्यासाठी आंतरराष्ट्रीय स्तरावरील धोरणात्मक करार करण्यात आला. ईपीडी ग्लोबलचे मुख्य कार्यकारी अधिकारी हॅकॉन हाऊआन आणि 'ग्रीनएक्स' चे सागर अहिवळे व आरती भोसले-अहिवळे यांनी या करारावर स्वाक्षऱ्या केल्या. त्यानंतर आयोजित पत्रकार परिषदेत त्यांनी याविषयी माहिती दिली. प्रसंगी मुख्य कार्यकारी अधिकारी विश्वास पिटके उपस्थित होते. तीन वर्षांकरीता हा करार झाला असून, भारतीय उद्योगसमूहांनी तयार केलेल्या उत्पादनांचे पर्यावरणीय परिणामांचे विश्लेषण ईपीडी ग्लोबलमार्फत अधिकृतपणे ग्रीनएक्स एन्व्हायर्नमेंटल करणार आहे. संबंधित उत्पादनाचा ईपीडी दस्तऐवज त्या उत्पादनावर, तसेच उत्पादकाच्या संकेतस्थळावर ग्राहकांसाठी उपलब्ध असणार आहे.

आरती भोसले-अहिवळे म्हणाल्या, "या सहकार्यातून ग्रीनएक्स एन्व्हायर्नमेंटल भारतातील ईपीडी जनरेशन सेवांचे अधिकृत प्रतिनिधी म्हणून काम पाहणार आहे. यामुळे देशभरात पर्यावरणीय उत्पादन विस्ताराला गती मिळणार आहे. शाश्वत विकास, पर्यावरणीय पारदर्शकता आणि आंतरराष्ट्रीय दर्जाचे पर्यावरण अहवाल व मानदंड यांना सक्षम करण्याच्या उद्देशाने या दोन्ही संस्था एकत्र येत आहेत. या उपक्रमातून भारतात अधिक जबाबदार, हरित आणि नवोन्मेषी उद्योगसंस्कृती घडविण्याचा मार्ग मोकळा होणार आहे. ग्रीनएक्सने गेल्या काही वर्षांत रसायने, अभियांत्रिकी, धातू, अन्न उद्योग अशा विविध क्षेत्रांतील ५० पेक्षा अधिक व्यवसायांसोबत ईपीडी प्रकल्प राबविले आहेत. ईपीडी ग्लोबलसोबतचा करार भारतीय उद्योगांना आंतरराष्ट्रीय स्तराचा दर्जा उपलब्ध करून देईल आणि प्रमाणपत्रांच्या खर्चात सुमारे ७० टक्के घट होईल."

सागर अहिवळे म्हणाले, "भारतातील छोट्या-मोठ्या उद्योगांचे जागतिक बाजारातील प्रदर्शन उल्लेखनीय आहे.

ईपीडी असलेली उत्पादने जगभरात अधिक प्राधान्याने स्वीकारली जात आहेत. त्यामुळे भारतीय एमएसएमई उत्पादकांना निर्यात वाढविण्यास आणि चांगला दर मिळविण्यास याचा मोठा फायदा होईल. पारदर्शकता वाढवणे, शाश्वततेकडे वाटचाल सुलभ करणे आणि जागतिक बाजारपेठेच्या निकषांनुसार स्वतःला सिद्ध करणे, हा या सहयोगाचा प्रमुख उद्देश आहे.

# सर्वांगीण शिक्षण, संस्कारक्षम उपक्रम सतत राबवणे मोबाईलचे खरे 'अँटी-व्हायरस'

## प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया यांचे प्रतिपादन; सूर्यदत्त संस्थेला 'महात्मा जोतीबा फुले राष्ट्रीय आदर्श शिक्षण संस्था' प्रदान

पुणे: (समर्थ गांवकरी)



"सर्वांगीण शिक्षण, संस्कारक्षम उपक्रम हेच खरे मोबाईलचे 'अँटी-व्हायरस' आहेत. मोबाईलचा गरजेपुरता वापर करीत विद्यार्थ्यांनी आपली कौशल्ये, बुद्धी आणि कलागुणांचा विकास करण्यावर भर द्यावा. महात्मा ज्योतिबा फुले यांनी दिलेल्या प्रबोधनपर विचारांचा अंगीकार करून त्या मार्गावर चालण्याचा प्रयत्न प्रत्येकाने केला पाहिजे," असे प्रतिपादन सूर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया यांनी केले. 'सूर्यदत्त' संस्थेने सुरुवातीपासून महात्मा फुले यांच्या प्रबोधनाच्या मार्गावर चालत निस्वार्थपणे विद्यार्थ्यांना शिक्षित करतानाच समाजकल्याणाच्या भावनेने कार्य करणारे सक्षम नागरिक घडवण्याचा प्राधान्य दिले असल्याचेही त्यांनी नमूद केले.

वानवडी येथील महात्मा फुले सांस्कृतिक सभागृहात आयोजित १२९ व्या अखिल भारतीय महात्मा फुले प्रबोधन मराठी साहित्य संमेलनाचे उद्घाटन प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया यांच्या हस्ते झाले. त्यावेळी प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया बोलत होते. अखिल भारतीय मराठी साहित्य परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. शरद गोरे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या संमेलनात राज्यभरातील नामांकित साहित्यिक, कवी, संशोधक, कलाकार व साहित्यप्रेमी उत्स्फूर्तपणे सहभागी झाले. यावेळी सूर्यदत्त ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्सला 'महात्मा जोतीबा फुले राष्ट्रीय आदर्श शिक्षण संस्था' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. महाराष्ट्रातील सारस्वत साहित्यिकांच्या साक्षीने आणि अखिल भारतीय मराठी साहित्य परिषदेच्या वतीने हा मानाचा सन्मान प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया यांनी स्वीकारला. सामाजिक बांधिलकीची परंपरा, शिक्षणातील नाविन्यपूर्ण उपक्रम, मूल्यआधारित शिक्षणपद्धती आणि राष्ट्रनिर्मितीच्या ध्येयाने मार्गक्रमण करणाऱ्या सूर्यदत्तच्या कार्याची दखल घेत हा पुरस्कार देण्यात आला. 'उद्धरेदात्मनाऽत्मानम्...' या जीवनमंत्राच्या प्रेरणेने विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सूर्यदत्त संस्था कार्यरत असल्याचे सांगत मान्यवरांनी संस्थेच्या कार्याचे कौतुक केले. प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया म्हणाले, "मराठी साहित्य हे महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आत्म्याचे संवाहक आहे. या परंपरेचे जतन, संवर्धन आणि पुढील पिढीपर्यंत पोहोचवणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. महात्मा जोतीबा फुले यांच्या प्रबोधनपर विचारांची उजळणी करणाऱ्या या प्रतिष्ठित संमेलनाचा भाग होणे माझ्यासाठी सन्मानाची बाब आहे.

# राज्यातील जिल्हा परिषदेची पहिली सीबीएससी शाळा वाघीत उभारणार

## आ. बालाजी कल्याणकर यांचे हस्ते भूमिपूजन

> आ. बालाजीराव कल्याणकर यांच्या सौभाग्यवती तथा शिवालय उद्योग समूहाच्या अध्यक्षा सौ. संध्याताई कल्याणकर म्हणाल्या की , नांदेड उत्तर भागाच्या विकासासाठी आ. बालाजी कल्याणकर कटिबद्ध आहेत.परंतु वर्तमान परिस्थितीत मुलींच्या संरक्षणाची चिंता वाटते आहे . मुली शाळेतही सुरक्षित राहिल्या नाहीत . त्यामुळे प्रत्येक मुलीला शाळेतून कराटेचे प्रशिक्षण दिले जावे . ज्यातून ती स्वतःचे रक्षण करू शकेल .यासाठी आ. बालाजी कल्याणकर यांनी स्वतः लक्ष देऊन या नूतन शाळेत मुलींसाठी मोफत कराटे प्रशिक्षणाची व्यवस्था करावी अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

नांदेड : (समर्थ गांवकरी)




खाजगी इंग्रजी शाळेतून दिले जाणारे सीबीएससी पॅटर्न चे आंतरराष्ट्रीय दर्जाचे शिक्षण जिल्हा परिषदेच्या शाळेतून मिळाले पाहिजे यासाठीचा पहिला यशस्वी प्रयत्न आ. बालाजी कल्याणकर यांनी केला असून नांदेड उत्तर भागातील वाघी येथे उभारल्या जाणाऱ्या महाराष्ट्रातील जिल्हा परिषदेच्या पहिल्या सीबीएससी च्या शाळेच्या इमारतीच्या बांधकामाचे भूमिपूजन आज त्यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी महंत १०८ जीवनदास महाराज बाबाजी यांच्यासह शिवसेनेचे पदाधिकारी, विविध क्षेत्रातील मान्यवर , या भागातील अनेक गावचे सरपंच , नागरिक , शिक्षक , विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

नांदेड जिल्हा परिषद बांधकाम विभाग , सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्या पुढाकारातून आणि आ. बालाजी कल्याणकर यांनी खेचून आणलेल्या निधीतून उभारण्यात येणाऱ्या वाघी येथील जिल्हा परिषद प्राथमिक, माध्यमिक शाळेच्या नूतन इमारतीचे भूमिपूजन आज सकाळी पार पडले.

यावेळी महंत १०८ जीवनदास महाराज बाबाजी, कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी नारायण भोसले,आ. बालाजीराव कल्याणकर, शिवालय प्रतिष्ठान अध्यक्षा सौ. संध्याताई कल्याणकर , पूर्व शिक्षण संचालक गोविंद नांदेडे, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख गंगाधर बडूरे, सहसंपर्कप्रमुख संतोष भारसावडे, महिला जिल्हाप्रमुख अपर्णा नेरलकर, मंगेश कदम , नारायण कदम राजु गुंडावार, श्याम पाटील कोकाटे, देवीदास सरोदे , गणेश बोकारे , धनंजय पावडे, गणपतराव राठोड माधव हिंगमिरे मीनाक्षी सुर्यवंशी महिला , दिपा थोरवट, माधुरी जाधव, ओमकार सूर्यवंशी , बाबुराव वाघ , काशिनाथ बोकारे, राजेश चव्हाण .शहाजी आढाव . हरीभाऊ भोसले . प्रल्हाद भोसले . उद्धव राठोड ., राजाराम नरडेले, शिवाजी भोसले,बाबा जानकर, नागोराव भोसले, देवराव भोसले, नवनाथ काकडे,रावसाहेब देवकत्ते मुख्याध्यापक, सार्वजानिक बांधकाम विभाग उप अभियंता संतोष नाईक, जिल्हा परिषद उपअभियंता बालाजी पवार, शाखाअभियंता बी.के घोडके, शाखा अभियंता पोले, शाखा अभियंता ओंकार तुपकरी यांच्यासह आदी मान्यवरांची यावेळी उपस्थिती होती.

यावेळी उपस्थितांशी संवाद साधताना आ. बालाजी कल्याणकर म्हणाले की , वाघी येथील जिल्हा परिषदेच्या शाळेत शेकडो विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. परंतु शाळेची इमारत मोडकळीस आली आहे. शाळेची इमारत जागोजागी गळू फुटले आहे. अशा परिस्थितीत विद्यार्थी , शिक्षक यांचे जीव धोक्यात आले आहेत. शाळा गळू लागल्याने विद्यार्थ्यांना शिक्षण घेण्यास अडचणी येत होते.

ही बाब लक्षात घेऊन वाघी येथील जिल्हा परिषद शाळेचा कायापालट करण्यासाठी मी राज्य सरकारकडे पाठपुरावा केला आणि येथे अद्ययावत शाळा उभारणीसाठी सव्वा तीन कोटी रुपयांचा निधी मंजूर करून घेतला. या निधीतून येथे सी बी एस सी पॅटर्न ची पहिली ते दहावी पर्यंत ची शाळा आणि विविध दहा खेळाची निवासी क्रीडा प्रबोधिनी , १०० विद्यार्थ्यांचे निवासी वसतिगृह उभारण्यात येईल. ही शाळा महाराष्ट्रातील सर्वात दर्जेदार शिक्षण देणारी आणि नव समाज , नव राष्ट्र घडविणारी शाळा ठरेल असा विश्वासही आ. बालाजीराव कल्याणकर यांनी व्यक्त केला.

विद्यार्थी , शिक्षक आणि पालक यांनी सुसंवाद वाढवावा , विद्यार्थिनींच्या संरक्षणासाठी पुढाकार घ्यावा असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.